


महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

सेतू-अभ्यास

(Bridge Course)

विषय- मराठी

(इयत्ता- दुसरी)

शैक्षणिक वर्ष २०२१ – २२

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

सेतू-अभ्यास (ब्रिज कोर्स) : इयत्ता - दुसरी

- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. वंदना कृष्णा**, (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा.विशाल सोळंकी**, (भा.प्र.से.)
  आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  मा.राहुल द्विवेदी (भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. कमलादेवी आवटे,** उपसंचालक (भाषा व समता विभाग)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  नीता जाधव, उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता, मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन सहाय्य** : **डॉ. नंदा भोर, अश्विनी नरवणे,** विषय सहायक, मराठी विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे.
- **निर्मिती गटप्रमुख** : **डॉ.बाबासाहेब बडे**,अधिव्याख्याता,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नाशिक
- **निर्मिती गटसदस्य** : १)**डॉ.जितेंद्र काठोळे**, विषय सहायक, जिल्हा शिक्षण व प्रशि. संस्था, अकोला
  २)**प्रदीप शिंदे** , विषय सहायक,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था.,नाशिक
  ३)**वर्षा चौधरी,**सहायक शिक्षक, जि. प. प्राथ. शाळा, खंबाळे,
  ता. इगतपुरी, जि. नाशिक.
  ४)**फारूक काझी**, सहायक शिक्षक, जि. प. प्राथ. शाळा, गौडवाडी,
  ता. सांगोला, जि. सोलापूर
  ५)**नम्रता पवार**, मुख्याध्यापक, सह्याद्री प्राथमिक विद्या मंदिर,
  संगमनेर, जि. अहमदनगर

विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो,

मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंत. तुमचं खूप खूप कौतुक! आता नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होतंय. पुन्हा जोमानं आपल्याला सुरुवात करायचीय. सुरुवातीला काही दिवस आपणाला मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी करायला हवी जेणेकरून या वर्षीच्या अभ्यासक्रमासाठी चांगली पूर्वतयारी होईल. ही पूर्वतयारी करणे सोयीचे व्हावे यासाठीच हा सेतू-अभ्यास तयार करण्यात आला आहे. मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू-अभ्यास तुम्हाला मदत करणार आहे.

त्यासाठी तुम्हाला काय करायचं? तर हा सेतू-अभ्यास दिवसनिहाय क्रमाने सोडवायचा आहे. यात वेगवेगळ्या कृतींचा समावेश आहे. या कृती सोडवताना तुम्हांला मजा येईल. पण लक्षात ठेवा, या कृती दिवसनिहाय तयार केलेल्या आहेत. तुम्ही दिलेल्या नियोजनाप्रमाणे कृती स्वप्रयत्नाने सोडवाव्यात. कृती सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत घ्यावी. प्रत्येक कृती मध्ये दिलेला पाठ्यांश अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी व्हिडीओ लिंक दिल्या आहेत, त्यांचा उपयोग करून संकल्पना समजून घेण्यास मदत होईल.

आणि हो, हा ४५ दिवसांचा सेतू-अभ्यास करताना यामध्ये दर पंधरा दिवसांनी तुम्हांला एक छोटीशी चाचणी सोडवायची आहे. चाचणी स्वतः एकट्याने सोडवा. चाचणी सोडवून झाल्यावर शिक्षकांकडून तपासून घ्या.

हा सेतू-अभ्यास सोडविताना काही भाग जसे की, चला सराव करू या, सक्षम बनू या यामधील कृती मध्ये अडचण आल्यास, न समजलेला किंवा अवघड वाटणारा भाग समजून घेण्यासाठी शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.

हा सेतू-अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

शिक्षक / पालकांसाठी सूचना

कोविड १९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हासेतू-अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू-अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
- सदर अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सदरअभ्यासात क्षेत्र, कौशल्य, संकल्पना व अध्ययन निष्पत्ती/क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.
- संकल्पनाप्रमाणे संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी **'जाणून घेऊ या'**, त्या संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या',** मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** व मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याने आधी चिकित्सक विचार करावा,सर्जनशील व्हावे,अर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या विकासासाठी **'कल्पक होऊ या'** या सदरांचा समावेश केला आहे.
- संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून सर्वच कृतीमध्ये दीक्षा ॲप, क्यु आर कोड इ. ची मदत घ्यावी.
- मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू-अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

- सेतू-अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधीनंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू-अभ्यास दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.
- चला सराव करू या हे सदर विद्यार्थी स्वप्रयत्नाने सोडवतील. याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.
- सदरील सेतू-अभ्यास हा शिक्षकांसाठी असला तरीही शाळा ऑफलाइन सुरू नसल्याकारणाने याचा वापर करून पालक, शिक्षक व मित्र यांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व पुढील इयत्तेत शिकावयाच्या कृतींची किंवा अभ्यासक्रमाची पूर्वतयारी घेऊ शकतील.
- या सेतू अभ्यासात दिलेल्या अध्ययन कृती या मार्गदर्शक असून शिक्षक आपल्या वर्गाच्या व विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांच्या अध्ययन संदर्भात इतर आवश्यक त्या कृती घेऊ शकतात.
- वयानुरूप समकक्ष वर्गातील मुलांसाठी SCERT मार्फत तयार केलेल्या विद्यार्थी मित्र व शिक्षक मार्गदर्शिका यांचा संदर्भ म्हणून उपयोग करावा.

सेतू अभ्यासाच्या अंमलबजावणी आपणास हार्दिक शुभेच्छा!

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

सेतू-अभ्यास

इयत्ता – दुसरी **विषय – मराठी** **कालावधी – ४५ दिवस**

➢ उद्दिष्टे:-

1. कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनात अध्ययनाविषयी आत्मविश्वास निर्माण करून शिकण्यासाठी आनंददायी वातावरणाची निर्मिती करणे.
2. विद्यार्थ्यांना गत शैक्षणिक वर्षातील संबंधित इयत्तेच्या भाषा अध्ययनातील अंतर भरून काढण्यास मदत करणे.
3. विद्यार्थ्यांना मागील इयत्तानुरूप भाषा विषयातील अपेक्षित अध्ययन निष्पत्तीनुसार समजपूर्वक वाचनाची संधी उपलब्ध करून संबंधित क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत करणे
4. विद्यार्थ्यांना मागील इयत्तेशी जोडून घेण्यासाठी स्वयंअध्ययनासाठी उपयुक्त अशा आनंददायी व कृतियुक्त आशयाची निर्मिती करणे.
5. विद्यार्थ्यांना अभिव्यक्त (लेखन) होण्याची संधी उपलब्ध करून देणे.

➢ अध्ययन क्षेत्र :-

१.मौखिक भाषा विकास

२.ध्वनीची जाण

३.लिपीची जाण (परिचय)

४.वाचन

५.लेखन

अनुक्रमणिका

दिवस	क्षेत्र/कौशल्य/ संकल्पना/संबोध	पृष्ठ क्रमांक	दिवस	क्षेत्र/कौशल्य/ संकल्पना/संबोध	पृष्ठ क्रमांक
१	ओळख स्वतःची	८	२४	लेखन पूर्व तयारी -१	३१
२	भाषिक खेळ– १	९	२५	लेखन पूर्व तयारी -२	३२
३	भाषिक खेळ– २	१०	२६	अक्षर गट – क म आ ल . .	३३
४	पाककृती	११	२७	अक्षर गट – क म आ ल . .	३४
५	गाऊ या गाणी	१२	२८	अक्षर गट – इ, घ, र, ई, ब. .	३५
६	ऐकूया, म्हणूया	१३	२९	अक्षर गट – उ, न, स, प, . .	३६
७	उपस्थिती पत्रक	१४	३०	**चाचणी क्रमांक– २**	३७
८	गोष्ट ऐकून मुलांनी काढलेले चित्र वर्गात चिकटविणे	१५	३१	अक्षर गट – ए, च, ळ, ह, पूर्णविराम	३८
९	शब्द तोडणे	१६	३२	चित्रवाचन -१	३९
१०	शब्द जोडणे	१७	३३	चित्रवाचन - २	४०
११	शब्द ओळख	१८	३४	चित्रकथा वाचन	४१
१२	शब्दभेंड्या / शब्दसाखळी	१९	३५	सहभागी वाचन	४२
१३	गमतीशीर सूचनांचा खेळ	२०	३६	सहभागी शब्द वाचन -१	४३
१४	वर्णन ऐकून रचना तयार करणे	२१	३७	सहभागी शब्द वाचन – २	४४
१५	**चाचणी क्रमांक– १**	२२	३८	अक्षर गट - ध, य, फ, ओ, श,.	४५
१६	अक्षर गटवरून शब्द वाक्य ओळख	२३	३९	अक्षर गट – ण, ख, थ, औ, इ.	४६
१७	शब्द डोंगर	२४	४०	वाचनपाठाचे वाचन	४७
१८	वर्ग परिसर वाचन	२५	४१	वाचनपाठाचे वाचन	४८
१९	चित्र व वर्ग यांची तोंडी तुलना	२६	४२	सहभागी वाचन	४९
२०	गप्पा गोष्टी	२७	४३	वर्णमाला	५०
२१	चित्र गप्पा – १	२८	४४	लेखन नमुन्याचे कोलाज	५१
२२	चित्र गप्पा – २	२९	४५	**चाचणी क्रमांक– ३**	५२
२३	चित्र वर्णन	३०			

दिवस पहिला

क्षेत्र :- मौखिक भाषा विकास
कौशल्य:- श्रवण, भाषण- संभाषण
संकल्पना:- ओळख स्वतःची

अध्ययन निष्पत्ती- विविध उद्देशासाठी स्वतःच्या भाषेचा किंवा शाळेतील माध्यम भाषेचा वापर करून गप्पागोष्टी करतात. आपले मत व्यक्त करतात.

❖ जाणून घेऊ या :-

१) विद्यार्थ्यांशी गप्पागोष्टी करणे.
२) स्वतःच्या भाषेचा किंवा माध्यम भाषेचा वापर करणे.
३) माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारणे.
४) स्वतःचे अनुभव सांगणे.
५) मुलांशी सुसंवाद साधणे.
६) व्यक्त होण्याची संधी देणे.
७) श्रवण, भाषण कौशल्य विकास करणे.

✓ सक्षम बनू या:-

शिक्षकांनी मुलांशी सुसंवाद साधण्यासाठी स्वत:चा परिचय सोप्या भाषेत करून द्यावा.

स्वतःचे नाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, राहण्याचे गाव, इत्यादी दोन ते तीन वेळा मुलांना ऐकवा.

मग काही मुलांना नाव विचारा.

पाच मुलांचा गट करून गटात परिचय करून घ्या. याप्रमाणे नंतर सर्व मुलांना संधी देऊन परिचय घ्या. मुले इतरांचे नाव लक्षपूर्वक ऐकतात व स्वतःचा परिचय न घाबरता करून देतात. याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे.

चला सराव करूया :-

मुलांच्या घरातील आई, वडील, भाऊ, बहीण यांचे फोटो, चित्र दाखवून त्याविषयी बोलण्यास प्रवृत्त करतात. नाते विचारतात.

कल्पक होऊया :-

आई, वडील यांविषयी अधिक काही माहिती सांगा. त्यांची तुम्हाला कोणकोणत्या कामात मदत होते ते सांगा.



दिवस दुसरा

क्षेत्र :- मौखिक भाषा विकास.
कौशल्य :- श्रवण, भाषण – संभाषण
संकल्पना:- भाषिक खेळ– १

अध्ययन निष्पत्ती- भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात.

❖ जाणून घेऊ या :-

टाळ्यांचा खेळ.
ऐका व टाळी वाजवा.
भाषेतील विशिष्ट ध्वनी व शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद कसा घ्यावा,
सूचना ऐकून त्याप्रमाणे कृती करण्याचा सराव याविषयी माहिती द्या.
झालेल्या चुका दुरुस्त करून कृती मध्ये सुधारणा करून घ्या .
लक्षपूर्वक ऐकण्याचा सराव घ्या.
निरीक्षण योग्य करून त्याप्रमाणे कृती करण्याचा सराव घ्यावा.

✓ सक्षम बनू या :-

प्रथम प्रात्यक्षिक करून दाखवा.(मुलांना सहज समजेल या भाषेत सूचना कृती दाखविणे.)
एक टाळी वाजवा.
दोन टाळी वाजवा.
तीन टाळी वाजवा.
बोट पहा.जितके बोट तितक्या टाळ्या वाजवा.
एक, दोन, तीन.... याप्रमाणे बोटांच्या टाळ्या.

चला सराव करू या:-

हात पहा, टाळी वाजवा. समोर हाताचा तळवा असेल तर टाळ्या सुरू. हात विरुद्ध बाजूस केला की टाळी बंद.

कल्पक होऊ या :-

आपल्या हाताचा उपयोग कसा होतो ते सांगा.

दिवस तिसरा

क्षेत्र :- मौखिक भाषा विकास.
कौशल्य :- श्रवण, भाषण – संभाषण
संकल्पना:- भाषिक खेळ– २

अध्ययन निष्पत्ती - ऐकलेल्या गोष्टीविषयी आपले मत व्यक्त करतात.

भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात

❖ जाणून घेऊ या :-

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारा.
तुम्ही आईला पोळी/ भाकरी करताना पाहिले आहे का?
आई पोळी/ भाकरी कशी करते? तर आज आपण एक खेळ खेळूया.
यासारखे आणखी प्रश्न विचारून पूर्वज्ञान जाणून घ्या.

✓ सक्षम बनू या :-

खेळातून आनंददायी वातावरण निर्मिती, शिकण्याची आवड निर्माण करणे.
लाटा पोळी, थापा भाकरी हा खेळ घेऊया.
लॉकडाऊन काळात घरी आई जे काम करते त्याचे निरीक्षण केले का?
पोळ्या लाटणे, भाकरी करणे क्रिया समजणे. त्याप्रमाणे सूचना देऊन वरील कृतीचे दृढीकरण करा.
सराव, खेळ, श्रवण, निरीक्षण व कृती यांची सांगड शिक्षकांनी घालणे.
घरी आई कोणकोणते काम करते याविषयी चर्चा करा.
घरातील कामाची आई किंवा घरातील इतर सदस्य यांची कृती विषयी गटात प्रात्यक्षिक करणे.
पहा आणि सांगा.
चित्र पहा नाव सांगा. (घरातील वस्तू चित्रे -लाटणे, पोळपाट, तवा, कुकर, ताट, तांब्या, ग्लास, वाटी, बाटली)

चला सराव करूया :-

विद्यार्थ्यांना घरात असणाऱ्या वस्तूंची यादी करण्यास सांगावे.

कल्पक होऊया :-

घरातील काचेच्या वस्तूं आई कधी वापरते. तसेच इतर वस्तूंचे उपयोग कशासाठी करतो ते सांगा.

दिवस चौथा

क्षेत्र :- मौखिक भाषा विकास.
कौशल्य :- श्रवण, भाषण – संभाषण
संकल्पना:- पाक कृती – भेळ तयार करणे.

अध्ययन निष्पत्ती- माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारतात. स्वत:चे अनुभव सांगतात.घडणाऱ्या घटना,कृती आणि पात्र यांना एकसंधपणे पाहून सांगतात.

❖ जाणून घेऊ या :-

मुलांना माहीत असलेल्या किंवा आई बनवत असलेल्या विविध पाक कृतींची माहिती असते. त्याविषयी मुलांना बोलते करणे. जसे पोळी बनविण्यासाठी आई कोणते कोणते साहित्य घेते. कोणत्या क्रमाने कृती करते. येथे घटनेचा क्रम लक्षात घेणे महत्त्वाचे असते.
विद्यार्थ्यांना भेळ तयार करण्याची कृती सांगा.(पाठ्य पुस्तक पृ.क्र.२८)



✓ सक्षम बनू या :-

शिक्षकांनी स्वत: विद्यार्थ्यांच्या मदतीने भेळ बनविण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची यादी चर्चेतून करावी.
भेळ बनविण्याची कृती समजावून सांगणे.
भेळ बनविण्याचा घटना क्रम सांगणे.
तसेच भेळ बनविणे यात कोणकोणते साहित्य वापरतात कोणत्या क्रमाने वापरतात. याविषयी माहिती करून द्या.

चला सराव करू या:-

याप्रमाणे सरबत करणे,चहा करणे,भाकरी करणे या पाककृती वर चर्चा करून घटना क्रम तयार करण्यास सांगतील.

कल्पक होऊया :-

आई घरात कोणकोणते पदार्थ बनविते त्याचे निरीक्षण करा व उदाहरण सांगा.

दिवस पाचवा

क्षेत्र :- मौखिक भाषा विकास.
कौशल्य :- श्रवण, भाषण – संभाषण
संकल्पना:- गाऊ या गाणी.

अध्ययन निष्पत्ती- ऐकलेल्या कवितेविषयी गप्पा मारतात. आपले मत व्यक्त करतात. त्यातील अक्षरे / शब्द / वाक्ये पाहून आणि त्यांचे ध्वनी ऐकून, समजून ओळखतात.

❖ जाणून घेऊ या :-

१) शिक्षकांनी स्वतः शिकवलेली गाणी, कविता विद्यार्थ्यांकडून साभिनय म्हणवून घ्याव्यात. सुरुवातीस शिक्षकांनी गाण्याच्या ओळी स्वतः सांगाव्यात आणि विद्यार्थ्यांना मागे म्हणण्यास सांगावे नंतर समूहात, गटात, वैयक्तिक म्हणवून घ्याव्यात.
२) मुलांचे गाण्यातील शब्दांचे उच्चार, शब्दफेक याकडे लक्ष वेधून घ्यावे.
३) उदा. अग्गोबाई-ढग्गोबाई गाणे.
संदर्भ – बडबडगीते, गाणी, कविता यांचा संग्रह स्वयं अध्ययन उपक्रम आणि साहित्य शिक्षक हस्तपुस्तिका इयत्ता पहिली विषय मराठी हे वापरता येईल.



✓ सक्षम बनू या :-

शिक्षकांनी स्वतः गीत गायन कसे करावे हे प्रत्यक्ष करून दाखवावे.
उदा. एक होते झुरळ-चालत होते सरळ,
ससा, ससा दिसतो कसा
विद्यार्थ्यांच्या शब्द उच्चाराकडे, त्यांची चाल, लय याकडे लक्ष केंद्रित करणे. चित्र, शब्द सराव उदा. झुरळ, बस, ससा, कापूस.
संदर्भ – बडबडगीते, गाणी, कविता यांचा संग्रह स्वयं अध्ययन उपक्रम आणि साहित्य शिक्षक हस्तपुस्तिका इयत्ता पहिली विषय मराठी हे वापरता येईल.

चला सराव करूया :-

शिक्षकांद्वारे गाणी म्हणवून दाखविणे व गाणी गाण्यास प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे.

कल्पक होऊया :-

विद्यार्थ्यांच्या परिचयातील गाणी, कविता म्हणवून घ्या.

१) बोकोबा, बोकोबा २) वाघाची मावशी यासारखे गाणी शोधा.

दिवस सहावा

क्षेत्र:- मौखिक भाषा विकास
कौशल्य:- श्रवण
संकल्पना:- ऐकूया, म्हणूया.


अध्ययन निष्पत्ती- ऐकलेल्या गोष्टीविषयी गप्पा मारतात. वाचलेल्या गोष्टी, कविता यांतील अक्षरे/शब्द/वाक्ये इत्यादी पाहून आणि त्यांचे ध्वनी ऐकून, समजून ओळखतात.

❖ जाणून घेऊ या :-

शिक्षकांनी वाक्य पट्टया संग्रहातून एक एक वाक्य विद्यार्थ्यांना ऐकवावे वतेच वाक्य त्यांच्या कडून म्हणवून घ्यावे.

जसे – ही आमची शाळा आहे. आम्हाला शाळा खूप आवडते.

हीच कृती ध्वनीफितीच्या सहाय्याने घेता येईल.



✓ सक्षम बनू या :-

मुलांना ऐकुया, म्हणूया या कृती समजावून सांगा. यात सोप्या, सुटसुटीत वाक्य पट्टया यांचा संग्रह तसेच सोपी वाक्ये, ध्वनिफिती यांचा समावेश करा.

शिक्षकांनी स्वतः एक एक वाक्य सांगावे व प्रत्यक्ष मुलांकडून म्हणून घ्यावे.

प्रत्येक विद्यार्थ्याचा सहभाग असेल या पद्धतीने गटकार्य घ्यावे.

ऐकलेली साधी वाक्ये बिनचूकपणे म्हणता येतील असा सराव घ्यावा.

चला सराव करूया :-

शिक्षक मुळाक्षरे, स्वरचिन्हे यांचा समावेश असलेले वाक्य मुलांकडून म्हणून घेतील.

कल्पक होऊया :-

घरात बोलल्या जाणाऱ्या वाक्यांचा सराव करा. व सांगा. (उदा. जेवणाविषयी, पाणी भरताना, साफसफाई करताना.)

दिवस सातवा

अध्ययन क्षेत्र :-लिपीचीजाण (परिचय)
कौशल्य / क्षमता :-श्रवण, भाषण, वाचन, लेखन
संकल्पना / संबोध :- उपस्थितीपत्रक

अध्ययननिष्पत्ती :- परिचित आणि अपरिचित मजकुरामध्ये (उदा.स्वतःचे, नाव, इयत्ता, पुस्तकांचे नाव , इ.) रस घेतात, गप्पा गोष्टी करतात.

➢ जाणून घेऊ या ..

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांचे नाव विचारावे व त्याने सांगितलेले नाव त्याच्या समोरच कार्डशीटवर लिहावे. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे नाव क्रमवार पद्धतीने विचारणे. विद्यार्थ्यांचे विचारलेले नाव त्यांच्या समोरच लिहिणे. विद्यार्थ्यांची सर्व नावे कार्डशिटवर लिहून झाल्यावर ते भिंतीवर चिटकवणे. व विद्यार्थ्यांनी दररोज स्वतःच्या नावासमोर खूण किंवा स्वतःची सही करणे.

➢ सक्षम बनू या ..

वर्गात लावलेल्या उपस्थिती पत्रकावर स्वतःचे नाव शोधून विद्यार्थी स्वतःची उपस्थिती नोंदवतील.
विद्यार्थी टिक मार्क किंवा गिरगिट होणे यासारख्या कृती करतील तर ती त्यांना करू देणे.
अशा प्रकारच्या कृतीतून लिहिण्यासाठी काही तरी हेतू असतो, हे मुलांना समजेल.
उपस्थितीपत्रक ही कृती रोज करायची सवय हळूहळू मुलांना लावणे.
स्वतःचे नाव ओळखता येईल. निरीक्षण शक्ती वाढेल.

चला सराव करूया :-

नियमितपणे मुले वर्गात लावलेल्या उपस्थिती पत्रकावर दररोज स्वतःचे नाव शोधण्याचा सराव करतील.

विद्यार्थी स्वतःची दैनिक उपस्थिती नोंदवतील.

कल्पक होऊया (आव्हाने):-

काही मुले वर्गातील उपस्थिती पत्रकावर लिहिलेल्या आपल्या नावातील अक्षरापासून शब्द सांगतील.

दिवस आठवा

अध्ययन क्षेत्र :-लिपीचीजाण (परिचय)
कौशल्य / क्षमता :-श्रवण,भाषण ,वाचन,लेखन
संकल्पना / संबोध :- गोष्ट ऐकून मुलांनी काढलेले चित्र वर्गात चिकटविणे.

अध्ययननिष्पत्ती :- ऐकलेल्या गोष्टी विषयी (गोष्ट,कविता इ.) गप्पा मारतात, आपले मत व्यक्त करतात, गोष्ट ऐकून मुलांनी काढलेले चित्र वर्गात चिकटवितात. प्रश्न विचारतात.

➢ जाणून घेऊ या:-

गोष्ट ऐकून मुलांनी काढलेले चित्र वर्गात चिकटविणे.
मुलांना कोणत्या गोष्टी आवडतात ते जाणून घ्यावी.
मुलांच्या भावविश्वातील आवडीनुसार गोष्ट ऐकण्यासाठी उत्सुकता निर्माण करा.
मुलांच्या भावविश्वाशी निगडित गोष्ट ऐकवा.
पहिलीच्या मुलांच्या वयोगटानुसार व भावविश्वातील छोट्या गोष्टींचा संग्रह वापरावा.

➢ सक्षम बनू या ..

मुलांच्या आवडीनुसार गोष्ट ऐकवा.
ऐकलेल्या गोष्टीला अनुसरून चित्र काढण्याची सूचना किंवा संधी मुलांना द्यावी.
मुलांनी काढलेली चित्रे वर्गात दर्शनी भागात लावावी.
या कृती मधून मुलांनी लक्षपूर्वक ऐकले आहे की नाही ते समजेल.
मुलांच्या बोटांच्या स्नायूंवर नियंत्रण येण्यास मदत होईल.
स्वतःचे विचार भावना चित्रातून मांडण्याची संधी मिळेल व पर्यायाने आनंद ही मुलांना मिळेल.

चला सराव करू या ..

याप्रमाणे इतरही गोष्टी मुलांनी स्वतः ऐकून त्यावर चित्र काढण्याचा सराव करण्याची संधी द्यावी.

कल्पक होऊ या..

काढलेल्या चित्रांमधून पुन्हा गोष्ट सांगण्यासाठी मुलांना संधी द्यावी .

दिवस नववा

क्षेत्र - भाषाभ्यास

कौशल्य - ध्वनीची जाण
संकल्पना - शब्द तोडणे.

अध्ययन निष्पत्ती-

1) भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात.

➢ जाणून घेऊ या-

1) शिक्षकांनी या खेळाविषयी सविस्तर नियम समजावून सांगावे.
2) नाव / शब्द तोडणे हा खेळ वर्गातील मुलांची नावे घेवून खेळायचा आहे.
3) ज्या मुलाचे नाव घेऊन खेळ खेळणार आहात त्या मुलाला पुढे बोलवा.
4) प्रथम सोपी नावे घ्या.
5) शिक्षक एका विद्यार्थ्याचे नाव घेतील. उदा. रावी (एक अक्षर एक टाळी याप्रमाणे दोन अक्षरी रा-वी असे तोडून म्हणत दोन टाळ्या वाजविणे).
5) वरील प्रमाणे दोन, तीन, चार व पाच अक्षरी अशी अक्षरांची संख्या वाढवत नावे / शब्द तोडणे या खेळाचा सराव घ्यावा. (उदा. चेतन, सौदामिनी, जयप्रकाश)

➢ सक्षम बनूया -

1) शिक्षकांनी शब्द हा अक्षरांचा तयार झालेला असतो हे मुलांच्या लक्षात आणून द्यावे.
2) एक अक्षर म्हटले की लगेचच एक टाळी याकडे लक्ष केंद्रीत करा. (उदा.राजवीर - रा-ज-वी-र असे चार अक्षरी नाव म्हणताना बरीच मुले दोन-तीन टाळ्या वाजवतात. अशावेळी मुलांकडूनच सावकाश टाळ्या वाजवून घेऊन, मुलांना दुरुस्त करायला मदत करणे. प्रत्येक वेळी मुले प्रत्येक अक्षराला टाळी बरोबर वाजवत आहे ना याकडे लक्ष ठेवा.)

➢ चला सराव करू या

1) शिक्षकांनी विविध नावांचे / शब्दांचे उदाहरण देऊन मुलांचा जितकी अक्षरे तितक्या टाळ्या हा संबोध दृढ करावा.

कल्पक होवूया

1) वर्गातील सर्व मुलांची नावे घेवून जितकी अक्षरे तितक्या टाळ्या हा खेळ खेळा.
2) घरी गेल्यावर घरातील व्यक्तींची नावे घेवून हा खेळ खेळा.

दिवस दहावा

क्षेत्र - भाषाअभ्यास
कौशल्य - ध्वनीची जाण
संकल्पना - शब्द जोडणे

अध्ययन निष्पत्ती-

1) भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात.

➢ जाणून घेऊ या

1) नाव / शब्द जोडूया हा खेळ घेताना प्रथम वर्गातील दोन अक्षरी नाव असलेल्या मुलाला पुढे बोलवा.
2) प्रथम त्या मुलाचे नाव न सांगता नाव तोडून म्हणा. उदा. रा-वी असं नाव तोडून म्हणा व प्रत्येक अक्षरासाठी प्रत्येक अक्षर म्हणत असतानाच टाळी वाजवा. नंतर नाव पूर्ण जोडून म्हणून एकच टाळी वाजवा.

➢ सक्षम बनूया-

1) शिक्षक आता एकेका मुलाला पुढे बोलावतील व त्याच्या नावाचा वरीलप्रमाणे शब्द जोडणे हा खेळ घेतील
2) खेळ घेत असताना प्रत्येक मूल अक्षर म्हणत असतानाच टाळी वाजवत आहे ना ही काळजी घेतील.

✓ चला सराव करू या.

1) तीन, चार व पाच अक्षरी अशी अक्षरांची संख्या वाढवत नाव / शब्द जोडणे या खेळाचा सराव घ्यावा.
2) आता सराव करताना विविध वस्तूंसाठीही घ्या.प्रथम वस्तूंच्या नावांची यादी फळ्यावर लिहा. (यादी 4 ते 6 शब्दांची असावी, जास्त मोठी नको.)

जसे- पाटी
पुस्तक
दरवाजा
खोड रबर

उदा. पा-टी असं तोडून म्हणताना प्रत्येक अक्षर म्हणत असतानाच टाळी वाजवा. दोन अक्षरांसाठी दोन टाळ्या वाजवायच्या व लगेचच पाटी जोडून म्हणून एकच टाळी वाजवायची.
3) वरीलप्रमाणे उर्वरित एकेका शब्दाचा शब्द जोडणे खेळ घ्या.

कल्पक बनूया.

1) मुलांच्या मदतीने घरातील वस्तूंच्या नावांची शब्द यादी फळ्यावर करून घ्या.
2) शब्द लिहून झाल्यावर एकेक करून शब्द जोडणे-तोडणे खेळ घ्या. प्रत्येक शब्द म्हटल्यानंतर किती टाळ्या वाजवल्या व शब्दात किती अक्षरे आहेत ते विचारा.

दिवस अकरा

क्षेत्र- भाषाभ्यास
कौशल्य- ध्वनीची जाण
संकल्पना- शब्द ओळख

- **अध्ययन निष्पत्ती-**

१) भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात.

➢ जाणून घेऊ या.

1) प्रथम फळ्यावर कपाट हा शब्द लिहा.
2) कपाट हा शब्द तोडून म्हणा व फळ्यावर लिहा.
जसे- क-पा-ट
3) परत क-पा-ट हा शब्द सावकाश तोडून वाचून दाखवा. मुलांना काळजीपूर्वक ऐकायला सांगा. नंतर खालील प्रश्न विचारा.

१) सुरुवातीचा आवाज कोणता ते सांग?
२) मधला आवाज कोणता सांग?
3) शेवटी येणारा आवाज कोणता ते सांग?
असे प्रश्न विचारून शब्दातील आवाज लक्षात आणून द्या.

➢ सक्षम होऊ या.

1. प्रत्येक अक्षराला एक विशिष्ट ध्वनी असतो ही जाणीव मुलांना करून द्या.
2. प्रत्येक अक्षराला एक विशिष्ट आकार असतो हे सांगा

✓ चला सराव करू या

1. तीन अक्षरी शब्दांवर वरीलप्रमाणे फळ्यावर सराव घ्या.

कल्पक बनू या

१) भाषा साहित्य पेटीतील चित्रे पहा. त्यातील शब्द पाहून पहिला, शेवटचा ध्वनी ऐकून सांगा.
2)आणखी तीन अक्षरी शब्द मुलांना विचारा आणि आता मुलांकडून तोंडी वरीलप्रमाणे भरपूर सराव घ्या.

दिवस बारा

क्षेत्र- भाषाभ्यास
कौशल्य- ध्वनीची जाण
संकल्पना - शब्दभेंड्या / शब्दसाखळी

अध्ययन निष्पत्ती- भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात.

➢ जाणून घेऊ या

1) या खेळासाठी मुलांना गोलात बसवा.

2) कोणत्याही एका वस्तूचे नाव एका मुलाला सांगायला सांगा.

उदा. कप- कपमधे शेवटी कोणता आवाज ऐकू आला हे त्याच्या शेजारील मुलाला विचारा.--प

3) मग प ने सुरू होणारा शब्द सांग हे त्याच्या पुढील मुलाला विचारा.--पतंग

4)पतंगमधे शेवटी कोणता आवाज ऐकू आला सांग हे त्याच्या पुढील मुलाला विचारा.-- ग.

5)मग ग ने सुरू होणारा शब्द सांग हे त्यापुढील मुलाला विचारा. याप्रमाणे सर्व मुलांना सहभागी करून घ्या.

➢ सक्षम बनू या-

1)अक्षरात शेवटचा असणारा ध्वनी शब्द हा काही शब्दांत सुरूवातीला ही येतो हे ध्यानात आणून देणे.

✓ चला सराव करूया

1)परिसरातील प्राणी, पक्षी, वनस्पती यांच्या नावांच्या शब्दभेंड्या घ्या

चला कल्पक बनूया

आता हाच खेळ खालीलप्रमाणे विविध अटी घालून खेळता येईल.

1) शब्दातील पहिले अक्षर असलेला शब्द सांगणे ही अट घालून खेळायला सांगा. ते अक्षर शब्दात कुठेही आले तरी चालेल हेही सांगा.

(उदा. कप हा शब्द सांगा. कपमधे पहिला कोणता आवाज ऐकू आला हे पहिल्या मुलाला विचारा. क, मग क आवाज असलेला शब्द कोणता पुढील मुलाला विचारा. मका, मकामधे पहिला आवाज कोणता ऐकू आला सांग हे त्यापुढील मुलाला विचारा- म, मग म ने सुरू होणारा शब्द सांग हे त्यापुढील मुलाला विचारा .

याप्रमाणे सर्व मुलांना सहभागी करून घ्या.

2. शेवटी 'कन' असणारे शब्द घेऊन . उदा . चटकन , पटकन , कचकन

3. शेवटी 'वार' असलेले शब्द उदा. सोमवार, गवार

4. सुरवातीला 'प्र' असलेले शब्द याप्रमाणे गटात अशाप्रकारे शेवटी किंवा सुरवातीला वेगवेगळे प्रत्यय अथवा अक्षरे जोडले जाऊन बनणारे शब्द अशा असंख्य प्रकारे होऊ शकेल .

5. जेवढी टिंबे तेवढ्या अक्षरांचा शब्द उदा 1).. - मला , 2) …- अवनी 3)....- इमारत इत्यादी

6. कळ या शब्दात एक बदल करूनशब्द तयार करा. उदा.कळी, काळ, सकळ इ . (असे वड, वर, मन असे विविध पर्याय देता येतील .)

7) आवाजदर्शक शब्द घेऊन उदा. सळसळ, फुरफुर, टपटप यासारखे आणखी खेळ तुम्हालाही सहज शोधून काढता येतील .

दिवस तेरा

क्षेत्र- भाषाभ्यास
कौशल्य- ध्वनीची जाण
संकल्पना- गमतीशीर सूचनांचा खेळ

- **अध्ययन निष्पत्ती-**

1)भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात.

➢ जाणून घेऊ या

गमतीशीर सूचनांचा खेळ खेळूया-

(मुलाला ऐकलेले कितपत समजते, त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृती करता येते का हे तपासण्यासाठी आणि सरावासाठी हा खेळ आहे)

1) 'सापासारखे चाल' , 'उडी मार' , 'पळत जाऊन दार उघड', 'उजव्या पायावर उभे राहून लंगडी घाल' - अशा सूचना एकेका मुलाला द्या आणि त्याप्रमाणे मुलाने कृती करून दाखवा . इतर मुलांनी ते बरोबर आहे ना हे तपासावे आणि चुकले तर तसे सांगा.

➢ चला सक्षम बनू या-

1) आता अधिक गुंतागुंतीच्या सूचना कराव्यात. उदाहरणार्थ डाव्या हातात पेन्सिल घे आणि टेबलाच्या उजव्या ड्रॉवरमध्ये ठेव.

✓ चला सराव करू या-

- आता आणखी सूचना सांगून कृती करून घ्या.

कल्पक बनू या-

1. भरभर, मध्यम, सावकाश अशी आवाजाची वेगवेगळी पट्टी वापरून तशा गतीने कृती करून घ्या.
2. एकेका मुलाला सूचना देण्याची व इतर मुलांकडून कृती करून घेण्याची संधी द्या.

- (काही मुलांना एकदा ऐकून समजेल. काही मुलांना अधिक वेळा सांगावे लागेल, तर अशा मुलांना छोट्या सूचना देऊन कृती करून घ्या.)

दिवस चौदा

क्षेत्र- भाषाभ्यास
कौशल्य- ध्वनीची जाण
संकल्पना - वर्णन ऐकून त्यानुसार रचना तयार करणे.

अध्ययन निष्पत्ती-

1) भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द य़ांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात.
2) वाचलेल्या गोष्टी, कविता यातील अक्षरे / शब्द / वाक्य इ. पाहून आणि त्यांचे ध्वनी ऐकून त्यानुसार रचना तयार करणे.

➢ जाणून घेऊ या:-

1) दोन मुलांना पाठीला पाठ लावून बसायला सांगा. दोघांच्या हातात रंगीत कागदाचे किंवा रंगोमेट्रीचे तुकडे द्या
2) एका मुलाला तुकडे जमिनीवर प्रथम मांडायला सांगा. मांडत असताना तो ते तुकडे कसे मांडत आहे ते सांगायला सांगा. जसे- लाल कागदाचा तुकडा खाली ठेवला. त्याच्या डाव्या बाजूला हिरवा तुकडा ठेवला. हिरव्या तुकड्याच्या खाली सफेद तुकडा ठेवला.
3) पहिल्या मुलाने जसे सांगितले तशीच कृती दुसरा मुलगा कृती करेल. (या उपक्रमातून पहिल्या मुलाने आपल्या कृतीचे नेमक्या शब्दात वर्णन करणे आणि दुसऱ्या मुलाने बारकाईने ऐकून त्यानुसार कृती करणे अशा दोन्ही गोष्टी तपासल्या जातात. यात एक आव्हान असते. त्यामुळे अधिक लक्षपूर्वक काम केले जाते आणि मजाही येते.)

➢ सक्षम बनू या –

चित्र पहा त्याविषयी दोन तीन वाक्य सांगा. हाच खेळ वेगवेगळ्या पध्दतीने घेता येईल.
1) दोन मुलांना पाठीला पाठ लावून बसायला सांगा. दोघांच्या हातात कागद आणि पेन्सिल द्या.
2) एक मुलगा चित्र काढेल आणि तो कसे काढतो आहे ते बारकाईने दुसऱ्याला सांगत जाईल जसे, ' मी कागदाच्या वरच्या बाजूला एक आडवी रेघ काढली, मग त्या रेषेवर मध्यभागी एक साधारण बांगडी एवढा गोल आकार काढला ..
३) 'पहिल्या मुलाने जसे सांगितले तसे दुसरा मुलगा चित्र काढत जाईल. (दोन्ही मुलांना चित्र काढणे हे अधिक आव्हानात्मक असते. आव्हाने कठीण करत जाणे हे शिक्षणात हवे असते व मुलांना आनंददायी असते.)

✓ चला सराव करूया-

1) वरील कृतींचा गरजेनुरूप विविध वस्तू वापरून अधिकाधिक सराव घ्या.

कल्पक बनूया-

मुलांना विचारा हा खेळ आपण अजून कशाप्रकारे घेवू शकतो.
जसे पाठीवर अक्षरे लिहिणे व ओळखायला सांगा.
पाठीवर मुलामुलींची, वस्तूंची, प्राण्यांची, फुलांची इ. अटी घालून नावे गिरवणे व ओळखणे.

दिवस
पंधरा

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

सेतू-अभ्यास चाचणी क्र. १

विषय – मराठी

इयत्ता : दुसरी गुण १०

विद्यार्थ्याचे नाव : .....

प्रश्न १) विद्यार्थ्याला आवडणारे बडबडगीत म्हणावयास सांगणे. गुण १

प्रश्न २) शिक्षकांनी चार चार शब्दांचे गट करावेत. त्यापैकी तीन शब्द एक प्रकारचे व एक शब्द गटात न बसणारा असावा . विद्यार्थ्याने लक्षपूर्वक ऐकून गटात न बसणारा शब्द ओळखावा . गुण १

उदा. गुलाब, सिंह, चमेली, मोगरा

प्रश्न ३) सांगितलेल्या सुचनांप्रमाणे विद्यार्थ्यांना कृती करण्यास सांगावे. हा खेळ गटागटाने घ्यावा, त्यावेळी गटातील विद्यार्थ्यांचे नाव घेऊन तोंडी आज्ञा द्याव्यात दोन सूचना व दोन नकला करावयास सांगणे. गुण १

उदाहरणार्थ - उठा, पळा, नागमोडी चला, स्कूटर सुरू करा, काठी टेकवत चला या प्रमाणे विविध नकला करून घेणे.

प्रश्न ४) विद्यार्थ्यांला स्वतः संबंधीबोलण्यास सांगणे. गुण १

प्रश्न ५) दोन चित्रांची व शब्दपट्टयांची जोडी कृतीने जुळवून घेणे. गुण १

प्रश्न ६) विद्यार्थ्यांना पहिले अक्षर समान असणारे तीन परिचित शब्द ऐकवावेत. त्यातील समान ध्वनी कोणता ते विचारा.

उदाहरणार्थ- १) कप, कमळ, करडई गुण १

२) आई, आज, आपण

प्रश्न ७) शब्दात जेवढी अक्षरे तेवढ्या टाळ्या वाजव. गुण १

उदा. स-दा-फु-ली ---४ टाळ्या (या सारखे आणखी वेगळे मुलांच्या अनुभवातील शब्द सांगावेत)

प्रश्न ८) वर्गातील साहित्याच्या, वस्तूच्या नामपट्ट या योग्यठिकाणी ठेवणे . गुण १

फळा, टेबल, दरवाजा, पेटी, कपाट.....

प्रश्न ९) विद्यार्थ्यांला आवडणाऱ्या गोष्टीतील एखादी घटना सांगण्यास सांगावी. गुण १

प्रश्न १०) आवडणाऱ्या गोष्टीचे चित्र काढणे . गुण १

दिवस सोळा

क्षेत्र - भाषाभ्यास
कौशल्य- ध्वनीची जाण .
संकल्पना -अक्षर गट वरून शब्द, वाक्य ओळख

अध्ययन निष्पत्ती:- भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात. लिखित /छापलेल्या मजकुरातील अक्षर, शब्द आणि वाक्य असा प्रत्येक संबोध स्पष्ट ओळखतात.

➢ जाणून घेऊ या.

1. शिक्षक पाठ्यपुस्तकातील अक्षर गट क, म, ल, आ, ◌ा. डोळ्यासमोर ठेवून त्यावर आधारित शब्द व चित्र पट्टया या मुलांसमोर ठेवतील…
2. विद्यार्थ्यांना शब्द पट्टू याद्वारे ध्वनी ओळख करून देतील.
3. चित्र आणि शब्द यांचे वाचन घेतील.
4. शिक्षक फळ्यावर वाचनपाठासाठी लागणारे शब्द तयार करून घेतील .
   जसे- म ◌ा, म ◌ा – मामा, क ◌ा, क ◌ा- काका, अ ◌ा ल ◌ा- आला
5. विद्यार्थी निरीक्षण करतील.
6. वाचन पाठ वरून संपूर्ण वाक्य तयार करून दाखवतील….
7. विद्यार्थ्यांचा अक्षर शब्द व वाक्य यांची वाचन निरीक्षण सराव घेतील.

➢ सक्षम बनू या…

1. विद्यार्थी अक्षरपटटया व शब्दपटटया यांचे निरीक्षण करून शिक्षकांनी उच्चारलेला ध्वनी ऐकून अक्षर, शब्दपट्टी दाखवतील.
2. गटात क, म, ल, आ, ◌ा. या ध्वनीची व अक्षरांची ओळख दृढीकरण होण्यासाठी कलम, कमल, काका, मामा, कलाम, कमाल याप्रमाणे शब्द मुलांच्या मदतीने तयार करून घ्या.

   शिक्षकांनी मुलांच्या मदतीने खालीलप्रमाणे वाचनपाठ तयार करून घ्या.

   काका आला का
   काका काल आला
   मामा आला का
   मामा काल आला.

✓ चला सराव करू या.

भाषा साहित्यपेटीतील चित्र-शब्दपट्टू या यांचा वापर करून तोंडी वाक्य तयार करून घ्या.

कल्पक होऊ या.

या वाचनपाठाप्रमाणे पाठ्यपुस्तकातील पुढील अक्षरगटांचे वाचनपाठ विद्यार्थ्यांनी तयार करण्यासाठी प्रोत्साहन द्या .

दिवस सतरा

क्षेत्र -भाषाभ्यास

कौशल्य- ध्वनीची जाण.

संकल्पना-शब्द डोंगर.

अध्ययन निष्पत्ती:- भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात. लिखित /छापलेल्या मजकुरातील अक्षर, शब्द आणि वाक्य असा प्रत्येक संबोध स्पष्ट ओळखतात.

➢ जाणून घेऊ या.

शिक्षक प्रथम विद्यार्थ्यांना शाळा हा शब्द सांगतील.

विद्यार्थ्यांना शाळा शाळा या शब्दाला जोडून अर्थपूर्ण शब्द सांगण्यासाठी उद्युक्त करा. त्यांना सांगता न आल्यास शिक्षकांनी स्वतः सांगावे. व ते वाक्य दुसऱ्या ओळीत लिहावे.

विद्यार्थ्यांच्या मदतीने शब्द डोंगर तयार करा. फळ्यावर लिहा व वाचन करा.

जसे-

शाळा

माझी शाळा

माझी सुंदर शाळा

माझी स्वच्छ, सुंदर शाळा.

माझी स्वच्छ सुंदर आवडती शाळा....

➢ सक्षम बनवू या.

शब्द डोंगर म्हणजे वाक्यातील अर्थपूर्ण शब्द वाढवत जाणे हे मुलांच्या लक्षात आणून द्या.

यासाठी तुम्हाला सहज सुचतील असे परिसरातील / बोलीभाषेतील शब्द वापरले तरी चालतील

जसे-

झाड

ते झाड आहे

ते वडाचे झाड आहे.

ते वडाचे झाड हिरवेगार आहे.

याप्रमाणे शब्द वाढवत जाऊन शब्द डोंगर तयार करा. भाषा साहित्य पेटीतील चित्र वापरून देखील या प्रमाणे शब्दांचा डोंगर तयार करता येईल.

✓ चला सराव करू या.

पाच मुलांच्या गटात बसून शब्द डोंगर तयार करा. उदा. पेन, बाहुली, कुत्रा, गाय, आई, वडील इ.

कल्पक होऊ या...

तुमच्या घरातील कोणतीही एक वस्तू घेऊन वरील प्रमाणे किमान पाच ते सहा वाक्यांचा शब्द डोंगर तयार करा...

दिवस अठरा

क्षेत्र- वाचन

कौशल्य- श्रवण, भाषण, वाचन

संकल्पना- वर्ग, परिसर वाचन

अध्ययन निष्पत्ती- लिखित साहित्य आणि चित्र स्वरूपातील साहित्य यातील फरक सांगू शकतात.

➢ जाणून घेऊ या-

1) शिक्षकांनी वर्गातील विविध गोष्टींकडे निर्देश करावेत व 'हे काय आहे?' असे प्रश्न विचारावेत..
2) विद्यार्थी निर्देशित गोष्ट ओळखून नाव सांगतील. उदा. फळा, खडू, दरवाजा, पंखा इ.
3) वर्गातील शक्य त्या वस्तूवर त्या वस्तूच्या नावाची एक पट्टी चिकटवलेली असेल.
4) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना व्हरांडा, मैदान, शालेय परिसर फिरून दाखवावा.
5) "हे काय आहे?", "या खोलीला काय म्हणतात?" असे प्रश्न विचारतील. उदा. कार्यालय (ऑफिस), भाताची खोली (पोषण आहार शिजवण्याची खोली),इ.
6) शाळेचे नाव वाचायला सांगावे. (इथं अंदाजाने वाचन अपेक्षित आहे.)

➢ सक्षम होऊ या-

1) वर्गातील विद्यार्थ्यांचे गट करावेत.
2) वर्गात वाचन केलेल्या नामपट्ट्या मुलांना दाखवाव्यात.
3) त्यावर काय लिहिलेय हे अंदाजाने वाचायला सांगावेत.
4) मदत म्हणून त्या त्या वस्तूकडे निर्देश करावेत.
5) गटात एकेक नामपट्टी देऊन तिचे निरीक्षण करायला सांगावे.

✓ सराव करू या-

1) शिक्षकांनी कोणत्याही नामपट्टीवरील नाव वाचावे.
2) ती नामपट्टी ज्यांच्याकडे आहे तो गट/ तो विद्यार्थी ती पट्टीदाखवतील. तसेच वाचन करण्याचा प्रयत्न करतील. शक्य तिथे शिक्षकांनी मदत करावी.
3) बरोबर नामपट्टी ओळखणाऱ्या गटाचे कौतुक करतील.

कल्पक होऊ या-

1) वरील कृती विद्यार्थी गटांत एकमेकांत करून पहावी.
2) शिक्षकांनी केवळ निरीक्षक करावे.
3) शिक्षकांनी वातावरण आनंददायी राहील यासाठी प्रयत्न करावेत.
4) विद्यार्थ्यांना चूक असे न म्हणता शक्य तिथे मदत करावी
5) शिक्षकांनी सर्व नामपट्ट्या भिंतीवर विद्यार्थ्यांना दिसतील अशाटांगून ठेवाव्यात.

नामपट्ट्या- फळा, टेबल, नळ, खिडकी, दरवाजा, पंखा (फॅन), पुस्तक, वही, कपाट, पताका, टी.व्ही., मोबाईल, कचरा पेटी, बटण, खुर्ची इ.

दिवस एकोणवीस

क्षेत्र- वाचन

क्षमता/ कौशल्य- श्रवण, भाषण, वाचन

संकल्पना- चित्र व वर्ग यांची तोंडी तुलना

अध्ययन निष्पत्ती- लिखित साहित्य आणि चित्र स्वरूपातील साहित्य यातील फरक सांगू शकतात.



➢ जाणून घेऊया-

१) शिक्षकांनी पहिल्या दिवशी जी कृती घेतली त्याची उजळणी घ्यावी.
२) विद्यार्थ्यांना नामपट्टी दाखवून नाव विचारावेत.
३) आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मदत करावी.
४) पहिल्या इयत्तेच्या मराठी पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ पाहायला सांगावे.
५) शिक्षकांनी चित्रात कोणकोणत्या वस्तू आहेत हे विचारावे.

➢ सक्षम होऊ या-

१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी निरीक्षण केल्याची खात्री करून घ्यावी.
२) चित्रातील वर्ग आणि आपला वर्ग यात कोणता फरक आहे? असा प्रश्न विचारावा.
३) विद्यार्थ्यांच्या निरीक्षणाच्या तोंडी नोंदी तपासून/पडताळूनपहाव्यात.
४) नवीन शब्द फलकावर लिहावेत.
५) शिक्षकांनी स्वत: पुढे वाचावे आणि पाठोपाठविद्यार्थ्यांना वाचायला सांगावे.

✓ सराव करू या-



1) वरील फळांची चित्रे दाखवावीत. त्यांची नावे विचारावीत.
2) फळांच्या नावाच्या नामपट्ट या मुलांना दाखवाव्यात. चित्र व नाव यांची ओळख करून द्यावी.
3) उजळणी घ्यावी. (विविध चित्र आणि त्याची नावे अशा पट्ट या 'भाषा पेटीत' दिलेल्या आहेत. त्यांचा कल्पकतेने वापर करावा.)

कल्पक होऊ या-

१) शिक्षक नामपट्ट या विद्यार्थ्याकडे देतील
२) फळाचे नाव उच्चारताच त्या त्या नावाची नामपट्टी आणून देण्याची सूचना करावी.
३) बरोबर नामपट्टी आणणाऱ्या विद्यार्थ्यांचे/ गटाचे कौतुक करावे.
४) ज्यांना नामपट्टी ओळखता आली नाही त्यांना काही सूचक गोष्टी सांगून त्याचे मनोबल वाढवावे. त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करावे. मनोधैर्य वाढवावे.
५) शिक्षकांनी वर्गातील वातावरण आनंददायी व उत्साही ठेवावे.

दिवस वीस

क्षेत्र:- मौखिक भाषा विकास
कौशल्य:- भाषण- संभाषण
संकल्पना:- गप्पा-गोष्टी

अध्ययन निष्पत्ती- ऐकलेल्या गोष्टी विषयी गप्पा मारतात. आपले मत व्यक्त करतात. प्रश्न विचारतात.

❖ जाणून घेऊ या :-

शिक्षक विद्यार्थ्यांना संवाद साधण्यासाठी एक विषय द्या.
जसे – एक चांगली सवय
मुलांना बोलते करा..
यासाठी नखे कशा पद्धतीने काढावी. तसेच मुलांना ते नखे कसे काढतात याविषयी संभाषणात सहभागी करूनघ्या.
यासाठी २-३ विद्यार्थ्यांमध्ये संवाद घडून आणा., यातून चांगली सवय कोणती यावर चर्चा करा.. मुलांच्या अनुभवाशी निगडीत संवाद निवडा.



✓ सक्षम बनू या :-

शिक्षकांनी स्वतः एखाद्या संभाषणात सहभागी होऊन प्रत्यक्ष अनुभव द्यावा.
संवाद करताना मुलांना अडचण आल्यास मार्गदर्शन करावे.
यासाठी स्वयंअध्ययन उपक्रम आणि साहित्य शिक्षण हस्तपुस्तिका इयत्ता पहिली या पुस्तिकेचा वापर करावा.
उदा. चांगले की वाईट सांगा, रोज अंघोळ करणे, जेवताना टी. व्ही. पाहणे.

चला सराव करूया :-

वर्ग, शाळा, घर, परिसर यातील विविध संवाद देऊन मुलांची चर्चा घडवून आणावी.

कल्पक होऊया :-

विद्यार्थ्यांना अनुभव विश्वातील विविध विषय देऊन त्यातील चांगले, वाईट शोधणे. संवाद तयार करणे. सराव घ्यावा.

दिवस एकवीस

क्षेत्र :- मौखिक भाषा विकास,
कौशल्य :- श्रवण, भाषण संभाषण
संकल्पना :- चित्र गप्पा– १


अध्ययन निष्पत्ती- लिखित साहित्य आणि चित्र स्वरूपातील साहित्य यातील फरक सांगू शकतात. चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात. चित्र मालिका तील घटना, कृती समजतात.

❖ जाणून घेऊ या :-

पाठ्यपुस्तक इयत्ता दुसरी पृ. क्र.६. गोष्टीचे नाव लोभी कुत्रा.
शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करावयास सांगावे.
लोभी कुत्रा या चित्र कथेमध्ये पाच घटनाक्रम दिलेले आहेत. शेवटच्या सहाव्या घटनेची जागा रिकामी ठेवली आहे. मुलांनी चित्रांचे निरीक्षण करावे. चित्रांचा क्रम निश्चित करावा. त्यातील घटना स्वतःच्या शब्दात सांगावी आणि शेवटी काय घडले असेल यावर विद्यार्थ्यांनी चर्चा करावी.
गोष्ट विद्यार्थ्यांनीच पूर्ण करावी. विद्यार्थी कुठे अडल्यास सुलभकाने मदत करावी.

✓ सक्षम बनू या :-

शिक्षकाने स्वतः चित्र गप्पांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये सहभाग घेऊन मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांना बोलण्यास प्रवृत्त करावे.
गोष्ट पूर्ण करून सांगण्याचा सराव द्यावा.
भाषा पेटीतील हुशार कावळा या चित्र कार्डाचा वापर करून अधिक सराव करून घ्यावा.



चला सराव करूया :-

शिक्षक याप्रमाणे इतर चित्र कथांचे नियोजन करून चित्र निरीक्षण घेऊन विद्यार्थ्यांस बोलण्यास प्रवृत्त करतील.


कल्पक होऊ या :

दुसरी एखादी कथा पाहून त्यातील घटना क्रम सांग.

दिवस बावीस

क्षेत्र :- मौखिक भाषा विकास,
कौशल्य :- श्रवण, भाषण संभाषण
संकल्पना :- चित्र गप्पा– २

अध्ययन निष्पत्ती- चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात.



❖ जाणून घेऊ या :-

विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगा. मांजराची गंमत (पा.पु.क्र.३६).

खालील प्रश्नांच्या आधारे चित्र समजावून घेण्यास मदत करा आणि विदयार्थ्यांना बोलते करा.

१) चित्रांच्या घटनाक्रमाने विदयार्थ्यांना एकेक चित्र दाखवून त्याविषयी बोलते करा. मुलांच्या कल्पना विश्वाशी चित्रांची जुळवणूक करा.

२) या चित्रकथेतून मुलांना निखळ आनंद मिळेल याकडे लक्ष द्या. चित्रकथेतील मांजराप्रमाणे मांजर खरोखर असे करू शकते का याविषयी विचार करण्यास प्रवृत्त करा.

✓ सक्षम बनू या :-

शिक्षकांनी स्वतः चित्रवर्णन कसे करावे हे प्रत्यक्ष करून दाखवावे.
शिक्षकांनी मुलांना चित्राविषयी प्रश्न विचारावेत. चित्रांचा घटनाक्रम लक्षात घेण्यास मदत करावी.
विद्यार्थांना बोलते करणे, विचार प्रवृत्त करणे .
या सारखे इतर चित्र घेऊन चित्रवर्णन प्रत्यक्ष करून दाखवावे

चला सराव करूया :-

शिक्षक चित्र दाखवून विद्यार्थ्यांना निरीक्षण करण्यास सांगतील.

कल्पक होऊया :-

चित्राविषयी मुलांच्या अनुभवावर आधारित गप्पा मारा..

दिवस तेवीस

क्षेत्र :- मौखिक भाषा विकास,
कौशल्य :- श्रवण, भाषण संभाषण
संकल्पना :- चित्र वर्णन

अध्ययन निष्पत्ती- लिखित साहित्य व चित्र स्वरूपातील साहित्य यातील फरक ओळखतात. चित्रांचे बारकाईने निरीक्षण करतात. त्यातील घटना, कृती, पात्र पाहून माहिती सांगतात.


❖ जाणून घेऊ या :-

मुलांना इयत्ता दुसरी पाठ्य पुस्तक मधील पान क्र.३ मधील चित्र दाखवा.

चित्र निरीक्षण करण्यास सांगा. दोन चित्रात काय काय दिसते यावर चर्चा करा.

पाच मुलांचा एक गट याप्रमाणे मुलांना चित्र पाहून त्यावर बोलण्यास प्रवृत्त करा.

चित्र दाखवून सविस्तर वर्णन करा. दोन चित्रातील फरक सांगा.



✓ सक्षम बनू या :-

मुलांना चित्र निरीक्षण करताना कोणकोणत्या बाबी दिसतात याविषयी बोलू द्यावे. त्यांच्या भाषेचा, बोली भाषेचा स्वीकार करावा. विचार करण्यास प्रवृत्त करावे.

दोन चित्रातील फरक ओळखण्यासाठी या प्रमाणे इतर चित्र शोध व फरक सांग.याप्रमाणे कृती घ्यावी.

तसेच शिक्षकांनी स्वतः एका चित्रातील फरक शोधून चित्राविषयी बोलावे.

चला सराव करूया :-

भाषा साहित्य पेटीतील चित्रे देऊन गटाने चित्रातील फरक ओळख घ्यावी.

कल्पक होऊया :-


वर्तमानपत्र, इतर पुस्तके, गोष्टी पाहून त्यांतील चित्रांविषयी माहिती सांगा

दिवस चोवीस

क्षेत्र :- लेखन,
कौशल्य :- लेखन
संकल्पना :- लेखन पूर्वतयारी

अध्ययन निष्पत्ती :- चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात.

➢ जाणून घेऊ या



शिक्षकानी साहित्याच्या मदतीने खालील कृती विद्यार्थ्यांकडून करवून घ्याव्यात.

विद्यार्थी कृती करत असताना निरीक्षण करून आवश्यक तेथे मदत करावी.

वायर मध्ये मणी ओवणे, कागद फाडणे, कागद चुरगळणे, बाटलीचे टोपण लावणे, टोपण काढणे, सारखी चित्रे जोडणे .


➢ सक्षम बनू या


ठसेकाम –परिसरातील उपलब्ध असलेले साहित्य उदा. भेंडी, कांदा, बटाटे बाटलीचे टोपण, हातापायाच्या पंजांची ठसे घेणे. या कृती शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून करवून घ्याव्यात .



✓ चला सराव करूयात

ठिपके जोडून विविध रेषाकृती पूर्ण करणे. खाली दर्शविल्या प्रमाणे चित्रे विद्यार्थ्यांना द्यावीत





कल्पक होऊयात

शिक्षकांनी रांगोळी,रेती ,माती यापैकी कोणतेही माध्यम उपलब्ध करून देऊन त्यावर बोटांनी विविध मनासारखे आकार विद्यार्थ्यांना काढण्यास सांगावीत ..

दिवस पंचवीस

क्षेत्र :- लेखन,
कौशल्य :- लेखन
संकल्पना :- लेखन पूर्वतयारी

अध्ययन निष्पत्ती :- चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात. लेखन शिकतांना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार विकास उत्तरानुसार चित्रे आडव्या तिरप्या रेषा अक्षर आकृत्या स्वयम् पद्धतीने लेखन आणि व नियंत्रित लेखनाच्या माध्यमातून आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात

➢ जाणून घेऊ या

चित्राकृतीचा आतील भाग रंगविणे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध सोपी चित्रे काढून द्यावीत. विद्यार्थ्यांकडून चित्रातील आतील भाग रंगवून घ्यावा. विद्यार्थी कृती करत असताना निरीक्षण करून आवश्यक तेथे मदत करावी.

सक्षम बनू या

स्वतःचे व कुटुंबातील व्यक्तीचे चित्र काढणे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वतःचे चित्र काढण्यास सांगावे. काढलेले चित्र रंगविण्याची कृती घ्यावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जसे काढायचे तसे काढण्यास प्रोत्साहन द्यावे. विद्यार्थ्यांची चित्रे पाहून कौतुक करावे.


चला सराव करू या


रेषांचा सराव करणे इयत्ता. पहिली पाठ्यपुस्तक पण क्र.१२ व १३ वरील रेषांचा सराव करून घ्यावा.

कल्पक होऊ या




विद्यार्थ्यांना पाटीवर





असे विविध आकार काढून त्या आकाराच्या आत तसेच आकार काढण्यास सांगावे.

व त्यामध्ये रंग भरण्यास सांगावे



दिवस सव्वीस

क्षेत्र :- लेखन,
कौशल्य :- लेखन
संकल्पना :- अक्षर गट – क, म , आ, ल,ा

अध्ययननिष्पत्ती :- वर्णमालेतील अक्षरे व ध्वनी ओळखतात.

❖ जाणून घेऊ या ..

1) प्रथम अक्षर गटातील एक अक्षर फळ्यावर लिहा.
2) त्या अक्षरा भोवती गोल करा.
3) अक्षराच्या ध्वनीची ओळख करून देऊन, मुलांकडून या अक्षराने सुरू होणारे शब्द जाणून घ्यावे.
4) इयत्ता पहिली पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक १४ ते पृष्ठ क्रमांक १८ वर दिलेल्या कृतीचा वापर करावा. अक्षर गटातील अक्षरे मुले ओळखतात का? याची खात्री करावी.



➢ सक्षम बनू या ..

1. विचारलेले शब्द त्या अक्षरा भोवती लिहा. चित्रातील / पाठ्यपुस्तकातील कृतीचा आधार घ्या.
2. अपेक्षित ध्वनीने सुरुवात होणारे शब्द नसल्यास तो फळ्यावर बाजूला लिहा. बाजूला का लिहिला याची चर्चा करा.
3. प्रत्येक ध्वनीच्या योग्य उच्चारांची माहिती द्या. काही ध्वनींचा उच्चार स्वतः करून दाखवा.
4. प्रत्येक अक्षराची ओळख करून द्या. शब्द संपत्तीत वाढ व्हावी यासाठी आणखी शब्द सांगा.

सराव करू या :-

अक्षर गटातील अक्षर असणारे शब्द सांगा व शब्दातील संबंधित अक्षराला गोल करून घ्यावे. काही शब्द विद्यार्थ्यांना विचारावेत यासाठी सर्वांना संधी द्यावी.

कल्पक होऊया (आव्हाने):-

क, म , आ, ल,ा या अक्षरगटातील अक्षरावरून शब्दचक्र तयार करण्यास सांगा. अक्षर गटातील अक्षराला गोल करण्यास सांगावे.

दिवस सत्तावीस

क्षेत्र :- लेखन,
कौशल्य :- लेखन
संकल्पना :- अक्षर गट – क, म , आ, ल,ा

अध्ययन निष्पत्ती :- वर्णमालेतील अक्षरे व ध्वनी ओळखतात. लेखन शिकतांना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार विकास उत्तरानुसार चित्रे आडव्या तिरप्या रेषा अक्षर आकृत्या स्वयम् पद्धतीने लेखन आणि व नियंत्रित लेखनाच्या माध्यमातून आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात.

जाणून घेऊ या

शिक्षक अक्षर गटातील अक्षरे असलेल्या शब्द पट्ट या विद्यार्थ्यांनाद्याव्यात, अथवा फळ्यावर शब्द लिहून द्यावेत. व त्या अक्षरांभोवती गोल करण्यास सांगावे. जसे शब्दांमध्ये **क** शोधा व (क) त्याला गोल करा.

सक्षम बनू या

शिक्षकांनी अक्षर गटातील प्रत्येक अक्षराचे योग्य वळणानुसार विद्यार्थ्यांकडून पाटीवर लेखन करून घ्यावे.

सराव करू या .

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अक्षर गटातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द बनविण्यास व लिहिण्यास सांगावे. जास्तीत जास्त शब्द लिहिण्यास शिक्षकांनी प्रोत्साहन द्यावे.

कल्पक बनू या.

शिक्षकांनी ◌ा चिन्ह अक्षर गटातील शब्दांना लावून त्यांचे लेखन करून घ्यावे. शब्द बनविण्यास प्रोत्साहन द्यावे विद्यार्थ्यांचे कौतुक करावे.

दिवस अठ्ठावीस

क्षेत्र :- लेखन,
कौशल्य :- लेखन
संकल्पना :- अक्षर गट –
इ ,ि, घ ,र ,ई ,ी, ब

अध्ययन निष्पत्ती :- वर्णमालेतील अक्षरे व ध्वनी ओळखतात. लेखन शिकताना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार, विकासस्तरानुसार चित्रे, आडव्या-तिरप्या रेषा, अक्षर आकृत्या, स्वयं-पद्धतीने लेखन आणि स्व- नियंत्रित लेखनाच्या माध्यमातून आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात.

➢ जाणून घेऊ या

शिक्षक अक्षर गटातील अक्षरे असलेल्या शब्दपट्ट्या विद्यार्थ्यांनाद्याव्यात, अथवा फळ्यावर शब्द लिहून द्यावेत. त्या अक्षरांभोवती गोल करण्यास सांगावे. जसे शब्दांमध्ये **घ** शोधा व (घ) त्याला गोल करा.

उदा. घर, उघड. घडवंची, घडवणे, बघ इ.

➢ सक्षम बनू या

शिक्षकांनी अक्षर गटातील प्रत्येक अक्षराचे योग्य वळणानुसार विद्यार्थ्यांकडून पाटीवर लेखन करून घ्यावे.

इ ....., ब....., घ ....., र..... , ई.....,

ि अक्षर गटातील अक्षरे वापरून अक्षरे लिहा. जसे- बिरबल, किलबिल इ.

ी अक्षर गटातील अक्षरे वापरून अक्षरे लिहा. जसे- घरी, काकी इ.

इ. १ ली पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २४ ते २८ मधील कृती विचारत घ्याव्यात.

✓ सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अक्षर गटातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द बनविण्यास व लिहिण्यास सांगावे. जास्तीत जास्त शब्द लिहिण्यास शिक्षक प्रोत्साहन द्यावे.

कल्पक बनू या.

शिक्षकानी ि व ी चिन्ह आधीच्या अक्षर गटातील व या अक्षरगटातील अक्षरांना लावून त्यांचे लेखन करून घ्यावे. शब्द बनविण्यास प्रोत्साहन द्यावे. विद्यार्थ्यांचे कौतुक करावे.

	ा	ि	ी
क	का	कि	की
म	मा	मि	मी
ल	ला	.....	.....
घ	.....	घि	.....
र	.....	.....	.....
ब	.....	.....	.....

दिवस एकोणतीस

क्षेत्र :- लेखन,
कौशल्य :- लेखन
संकल्पना :- अक्षर गट –
उ, न, ु स, प, ऊ, त, ू

अध्ययन निष्पत्ती:- वर्णमालेतील अक्षरे व ध्वनी ओळखतात. लेखन शिकताना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार, विकासस्तरानुसार चित्रे, आडव्या-तिरप्या रेषा, अक्षर आकृत्या, स्वयं-पद्धतीने लेखन आणि स्व- नियंत्रित लेखनाच्या माध्यमातून आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात.

➢ जाणून घेऊ या

शिक्षकांनी अक्षर गटातील अक्षरे असलेल्या शब्द पट्ट्या विद्यार्थ्यांनाद्याव्यात, अथवा फळ्यावर शब्द लिहून द्यावेत. त्या अक्षरांभोवती गोल करण्यास सांगावे. जसे शब्दांमध्ये **न** शोधा व (न) असे गोल करा.

जसे की- नळ, नदी, नथ इ.

➢ सक्षम बनू या

शिक्षकांनी अक्षर गटातील प्रत्येक अक्षराचे योग्य वळणानुसार विद्यार्थ्यांकडून पाटीवर लेखन करून घ्यावे.

उ ....., न....., स....., प..... , ऊ....., त.....,

ु अक्षर गटातील अक्षरे वापरून अक्षरे लिहा. जसे- सुर, तुर, पुर, सुरगाणा इ.

ू अक्षर गटातील अक्षरे वापरून अक्षरे लिहा. जसे- नागपूर, नू, पू, तू इ.

इ. १ ली पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३० ते ३२ मधील कृती विचारात घ्याव्यात.

सराव करू या. **शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अक्षर गटातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द बनविण्यास व लिहिण्यास सांगावे. जास्तीत जास्त शब्द लिहिण्यास प्रोत्साहन द्यावे.**

कल्पक बनू या-

शिक्षकांनी ु व ू चिन्ह अक्षर गटातील शब्दांना व आधीच्या अक्षर गटातील अक्षरांना लावून त्यांचे लेखन करून घ्यावे. शब्द बनविण्यास प्रोत्साहन द्यावे विद्यार्थ्यांचे कौतुक करावे. शब्द खेळ घ्यावेत.

शब्दखेळ – तक्त्यात दिलेल्या अक्षरांपासून जास्तीत जास्त शब्द बनवण्यास सांगा

ना	ऊ	आ	पु	र
क	ब	स	ल	घा
मू	मा	न	ता	कि
ल	सु	कु	घ	नि
ती	पि	तू	प	ई

दिवस
तीस

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

सेतू-अभ्यास चाचणी क्र. २

विषय – मराठी

इयत्ता : दुसरी गुण १०

विद्यार्थ्याचे नाव : .....

प्रश्न क्र. 1) क ◌ा - का तर म ◌ा - ..... काय? गुण १

प्रश्न क्र. 2) शिक्षकांनी काही दोन वाक्य असलेले शब्दडोंगर कार्ड तयार करावेत व तिसरे वाक्य विचारावे. गुण १

जसे- घर

माझे घर

प्रश्न क्र. ३) पाच फळांची चित्र व त्यांच्या नामपट्ट्या यांच्या जोड्या लावण्यास द्या गुण १

प्रश्न क्र. ४) तुझी स्वतःची कोणतीही एक चांगली सवय सांग. गुण १

प्रश्न क्र. ५) चित्रवर्णन कर. (मुलांच्या भावविश्वातील चित्र देऊन त्याचे चित्रवर्णन करण्यास सांगा.) गुण १

प्रश्न क्र. ६) साम्यभेद असलेल्या दोन चित्रांतील फरक ओळखण्यास विद्यार्थ्यांना सांगा. गुण १

प्रश्न क्र. ७) शिक्षकांनी झालेल्या अक्षरगटावर आधारीत विद्यार्थी संख्येइतके फळ्यावर शब्द लिहावेत व प्रत्येक विद्यार्थ्याकडून एका शब्दातील कोणत्याही एका अक्षराला गोल करण्यास सांगा. गुण १

प्रश्न क्र. ८) खालील शब्दांतील योग्य अक्षराला ◌ा लावून अर्थपूर्ण शब्द तयार कर गुण १

१) कपट २) मम ३) दरवजा ४) फळ

प्रश्न क्र. ९) खालील शब्दातील दुसऱ्या अक्षराला ◌ी लाव. गुण १

१) वह_ २)पाकट ३) कळ ४) पाट_

प्रश्न क्र. १०) खालील शब्दातील ◌ु असलेल्या अक्षराला गोल कर. गुण १

१) कुलूप २) झुळूक ३) जुलूम ४) सुरू

दिवस एकतीस

क्षेत्र :- लेखन,
कौशल्य :- लेखन
संकल्पना :- अक्षर गट – ए, च, ळ, ह, झ, ◌े, . पूर्ण विराम, द, ड, व, ग, ऐ, ◌ै

अध्ययन निष्पत्ती:- वर्णमालेतील अक्षरे व ध्वनि ओळखतात. लेखन शिकताना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार, विकासस्तरानुसार चित्रे, आडव्या-तिरप्या रेषा, अक्षर आकृत्या, स्वयं-पद्धतीने लेखन आणि स्व- नियंत्रित लेखनाच्या माध्यमातून आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात.

➢ जाणून घेऊ या

शिक्षकांनी अक्षर गटातील अक्षरे असलेल्या शब्द पट्ट्या विद्यार्थ्यांनाद्याव्यात, अथवा फळ्यावर शब्द लिहून द्यावेत. त्या अक्षरांभोवती गोल करण्यास सांगावे. जसे शब्दांमध्ये **ह** शोधा व (ह) असे गोल करा.

जसे की- हसा, हवा, हरिण, हत्ती इ.

➢ सक्षम बनू या

शिक्षकांनी अक्षर गटातील प्रत्येक अक्षराचे योग्य वळणानुसारविद्यार्थ्यांकडून पाटीवर लेखन करून घ्यावे.

ए ....., च....., ळ....., ह..... , झ....., द....., ड....., व....., ग....., ऐ.....,

◌े अक्षर गटातील अक्षरे वापरून अक्षरे लिहा. जसे- सुर, तुर, पुर, सुरगाणा इ.

◌ै अक्षर गटातील अक्षरे वापरून अक्षरे लिहा. जसे- नागपूर, नू, पू, तू इ.


✓ सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अक्षर गटातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द बनविण्यास व लिहिण्यास सांगावे .जास्तीत. जास्त शब्द लिहिण्यास शिक्षक प्रोत्साहन द्यावा. तीन शब्दांचे वाक्य बनविणे व शेवटी पूर्णविराम देणे ही कृती करून घेणे.









कल्पक बनू या


शिक्षकांनी ◌े व ◌ै चिन्ह अक्षर गटातील शब्दांना लावून त्यांचे लेखन करून घ्यावे. आधीच्या अक्षर गटातील अक्षरांना चिन्ह लावून शब्द बनविण्यास प्रोत्साहन द्यावे विद्यार्थ्यांचे कौतुक करावे. विद्यार्थ्यांचा शब्दखेळ घ्यावा.

शब्द खेळ -२) शेवटी **ळी** असणारे जास्तीत जास्त शब्द बनवा व लिहा.

दिवस बत्तीस

क्षेत्र- वाचन
क्षमता/कौशल्य- श्रवण, भाषण, वाचन
संकल्पना- चित्र वाचन.

अध्ययन निष्पत्ती-चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात.



➢ जाणून घेऊ या-

१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बाजाराविषयी जे माहिती आहे ते विचारून घ्यावे.
२) त्यांना बाजारातील माहीत असलेल्या गोष्टी विचारून घ्याव्यात.
३) विद्यार्थी बाजारात गेला असेल तर त्यांचे अनुभव जाणून घ्यावेत.

➢ सक्षम होऊ या-

१) पृष्ठ क्रमांक ४० वरील चित्राचे निरीक्षण करायला सांगावे.
(संदर्भ-इयत्ता पहिली मराठी पाठ्यपुस्तक)
२) चित्रात काय काय आहे? अशा स्वरूपाचे प्रश्न विचारून त्या नावांची यादी फळ्यावर लिहावी.
३) छापील मजकूर वाचता येतो का? हे पहावे. किंवा गाड्यावर काय विक्रीसाठी आहे ते पाहून त्या गाड्यावर काय लिहिले असेल याचा अंदाज बांधायला सांगावे.
४) शिक्षकांनी नावे सुस्पष्ट हस्ताक्षरात फलकावर लिहावीत..
५) शिक्षकापाठोपाठ विद्यार्थ्यांनी प्रकटवाचन करावे.

✓ सराव करू या-

शिक्षकांनी फलकावर लिहिलेल्या शब्दांच्या वाचनाचा सराव घ्यावा.

कल्पक होऊ या-

चित्रात पाहिलेले व फलकावर वाचलेले अर्थपूर्ण शब्द शोधायला सांगावेत.

बा	ओ	ली	भे	ळ
जा	गा	चा	घं	पि
र	डा	क	टा	श
आ	ई	स्क्री	म	वी


दिवस तेहतीस

क्षेत्र- वाचन
क्षमता/कौशल्य- श्रावण, भाषण, वाचन
संकल्पना- चित्र वाचन.

अध्ययन निष्पत्ती- चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात.

➢ जाणून घेऊ या-

१) तिस-या दिवशी वाचलेल्या नामपट्टू यावरील शब्द ओळखायलासांगावेत. (शिक्षकांनी शब्दांच्या पट्टू या तयार करणे अपेक्षित आहे.)
२) विद्यार्थी वाचन करतात की नाही याचे निरीक्षण करावे.
३) कोणते शब्द वाचताना अडचण येते हे पाहावे.
४) कठीण शब्द पुनः पुन्हा वाचून दाखवावेत.



➢ सक्षम होऊ या-

१) पृष्ठ क्रमांक ४१ वरील चित्राचे निरीक्षण करायला सांगावे.
(संदर्भ-इयत्ता पहिली मराठी पाठ्यपुस्तक)
२) चित्रात काय काय आहे? अशा स्वरूपाचे प्रश्न विचारून त्या नावांची यादी फळ्यावर करावी.
३) छापील मजकूर वाचता येतो का? हे पहावे. किंवा गाड्यावर काय विक्रीसाठी आहे ते पाहून त्या गाड्यावर काय लिहिले असेल याचा अंदाज बांधायला सांगावे.
४) शिक्षकांनी नावे सुस्पष्ट हस्ताक्षरात फलकावर लिहावीत.
५) शिक्षकांच्या पाठोपाठ विद्यार्थ्यांनी प्रकटवाचन करावे.

✓ सराव करू या-

शिक्षकांनी फलकावरील शब्दांचा सराव घ्यावा.

● कल्पक होऊ या-

चित्रात पाहिलेले व फलकावर वाचलेले अर्थपूर्ण शब्द शोधायला सांगावेत.

कि	म	का	हा
रा	ड	प	तो
णा	के	ड	डी
क	र	व	त

दिवस चौतीस


क्षेत्र- वाचन
क्षमता/कौशल्य- श्रावण, भाषण, वाचन
संकल्पना- चित्रकथा वाचन.

- **अध्ययन निष्पत्ती-** चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात. चित्रातील वा चित्र मालिकांतील घडणाऱ्या वेगवेगळ्या घटना, कृती आणि पात्र यांना एकसंधपणे पाहून त्यांचे आकलन करतात.

➢ जाणून घेऊ या-

१) शिक्षकांनी चौथ्या दिवशी वाचलेले शब्द विद्यार्थ्यांना ओळखता येतात का? हे पहावे. (नामपट्ट या अपेक्षित)
२) कठीण वाटणारे शब्द शिक्षकांनी पुनःपुन्हा उच्चारावेत व उच्चारून घ्यावेत.
३) विद्यार्थ्यांना पाठोपाठ वाचायला सांगावे.
४) नामपट्ट या समोर दिसतील अशा रीतीने टांगून ठेवाव्यात.

➢ सक्षम होऊ या-



१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'मांजराची गंमत' ही चित्रकथा दाखवावी.
२) चित्रात काय काय दिसतंय? असे प्रश्न विचारावेत.
३) मांजर नेमकं काय करत आहे? मांजर का बरं दुध घेत आहे? असे तर्क करणारे प्रश्न विचारावेत.
४) चित्रकथेतील गंमत विद्यार्थ्यांना विचारून घ्यावी.
५) विद्यार्थ्यांना चित्रकथा पूर्ण करायला सांगावी.
६) अधिकाधिक विद्यार्थ्यांना संधी द्यावी.

✓ सराव करू या-

मांजर, दुध, उंदीर, पातेले, घर, भाकरी, टोपली, दुधवाला, मडके, भांडे इ. शब्दांचे वाचन करायला सांगावे.
शिक्षकांनी आणखी शब्दांचा सराव घ्यावा.

कल्पक होऊ या-


१) चित्रावरून गोष्ट सांगायला सांगतील
२) गोष्टीतील मजा अनुभवायची संधी देतील.
३) मांजरा ऐवजी उंदराने दुध घेतलं असतं तर काय झालं असतं बरं अशा प्रश्नांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देतील.

दिवस पस्तीस

क्षेत्र- वाचन
क्षमता/कौशल्य- श्रावण, भाषण, वाचन
संकल्पना- सहभागी वाचन.

अध्ययन निष्पत्ती- वाचलेल्या गोष्टी, कविता यातील अक्षरे/शब्द/वाक्ये इत्यादी पाहून आणि त्यांचे ध्वनी ऐकून, समजून घेऊन ओळखतात.

➢ जाणून घेऊ या-



१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'झोपाळा गेला उडून' या पाठाचे निरीक्षण करायला सांगावे.
२) चित्रात काय काय दिसले? असे प्रश्न विचारून विद्यार्थ्यांकडून चित्रातील तपशील मिळवावेत.
३) विद्यार्थ्यांना गोष्ट माहिती आहे का? याची विचारणा करावी.
४) विद्यार्थ्यांना चित्रांचा क्रम लक्षात घेऊन गोष्ट सांगायला लावावी.

➢ सक्षम बनू या-

१) मोठ्या आकारातील गोष्टीचे पान विद्यार्थ्यांसमोर धरावे.(टीव्हीवरही एकेक पान दाखवता येईल. कर्सरच्या मदतीने प्रत्येक शब्दावर संकेत करता येतील.)
२) चित्राचे निरीक्षण करत करत मजकूर वाचून दाखवावा. वाचताना प्रत्येक शब्दाखाली बोट ठेवून वाचन करावे. कोणता शब्द कसा वाचायचा याची ओळख करून द्यावी.
३) उच्चार सुस्पष्ट आणि सर्वांना ऐकू जाईल असाकरावा.
४) गोष्ट वाचून होताच त्यावर गप्पा माराव्यात.

✓ सराव करू या-

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना थोडक्यात गोष्ट सांगावी.

कल्पक होऊ या-

१) विद्यार्थ्यांना गोष्ट सांगण्याची संधी द्यावी.
२) गोष्टीतील मजा अनुभवण्याची संधी द्यावी.
३) विद्यार्थ्यांना स्वत:च्या मनाने गोष्ट सांगायची असेल तर तशी संधीद्यावी. विद्यार्थ्यांना अधिकाधिक बोलू द्यावे.

दिवस छत्तीस

क्षेत्र- वाचन
क्षमता/कौशल्य- श्रवण, भाषण, वाचन
संकल्पना- सहभागीशब्द वाचन.

अध्ययन निष्पत्ती- लिखित साहित्यातील अक्षरे, शब्द आणि वाक्ये ही एकके ओळखतात. उदा. 'माझे नाव विमल आहे.' हे कोठे लिहिलेले आहे ते दाखव/ यात नाव शब्द कोठे आहे? 'व' वर बोट ठेव.

➢ जाणून घेऊ या-

१) शिक्षकांनी फलकावर काही शब्द लिहावेत. त्यांचे वाचन करावे.

काका	नाक	मीरा	कळी	आवाज
गाल	इडली	आणि	रिमा	पाणी

२) विद्यार्थ्यांनी निरीक्षण करावे.
३) शिक्षकांच्या पाठोपाठ विद्यार्थ्यांनी वाचन करावे.
४) विद्यार्थ्यांना वाचायला कठीण वाटलेले शब्द कोणते? याची नोंद घ्यावी.

➢ सक्षम होऊ या-

१) शिक्षकांनी भाषा पेटीतील स्वरचिन्ह विरहित शब्द, काना, पहिली वेलांटी, दुसरी वेलांटी असणा-या पाच-पाच शब्दांच्या पट्टया निवडून विद्यार्थ्यांना गटात वाचयला द्याव्यात.
२) शिक्षकांनी निरीक्षण करावे.
३) विद्यार्थ्यांना कठीण वाटणारी मुळाक्षरे, शब्द, उच्चार यासाठी मदत करावी.
४) शब्दपट्टया गट बदलून द्याव्यात. त्यांचेही वाचन करायला सांगावे.
५) गटप्रमुखाची मदत घ्यावी.

✓ सराव करू या-

वाचलेले सर्व शब्द पुन्हा एकदा वाचून घ्यावेत. कठीण वाटणारी अक्षरे, शब्द, उच्चार यांचा पुन:पुन्हा सराव द्यावा.

कल्पक होऊ या-

अर्थपूर्ण शब्द शोधूया. वाचूया.

आ	ई	प	प	ई
घ	र	म	ऊ	र
म	का	न	स	सा
इ	मा	र	त	पा
बा	क	मा	ला	ल

दिवस सदतीस

क्षेत्र- वाचन
क्षमता/कौशल्य- श्रवण, भाषण, वाचन
संकल्पना- सहभागी शब्द वाचन.

अध्ययन निष्पत्ती- लिखित साहित्यातील अक्षरे, शब्द आणि वाक्ये ही एकके ओळखतात. उदा. 'माझे नाव विमल आहे.' हे कोठे लिहिलेले आहे ते दाखव/ यात नाव शब्द कोठे आहे? 'व' वर बोट ठेव.

➢ जाणून घेऊ या-

१) शिक्षकांनी फलकावर खालील शब्द लिहावेत. त्यांचे वाचन करावे.

बशी	सुवास	तेरा	सैनिक	पॅड
लालू	केर	बैल	बॅट	कॉल

२) विद्यार्थ्यांनी निरीक्षण करावे.
३) शिक्षकांच्या पाठोपाठ विद्यार्थ्यांनी वाचन करावे.
४) विद्यार्थ्यांना वाचायला कठीण वाटलेले शब्द कोणते? याची नोंद शिक्षकांनी घ्यावी.

➢ सक्षम होऊ या-

१) शिक्षकांनी भाषा पेटीतील दुसरी वेलांटी, पहिला उकार, दुसरा उकार, मात्रा, दोन मात्रे, ऍ स्वरचिन्ह असणारे शब्द, ऑ स्वरचिन्ह असणारे शब्द असणा-या पाच-पाच शब्दांच्या पट्ट्या निवडून विद्यार्थ्यांना गटात वाचयला द्याव्यात.
२) शिक्षकांनी निरीक्षण करावे.
३) विद्यार्थ्यांना कठीण वाटणारी मुळाक्षरे, शब्द, उच्चार यासाठी मदत करावी.
४) शब्दपट्ट्या गट बदलून देतील वाचन करायला सांगतील.
५) गटप्रमुखाची मदत घेतील.

✓ सराव करू या-

गटात दिलेले सर्व शब्द पुन्हा एकदा वाचून घ्याव्यात. कठीण वाटणारी अक्षरे, शब्द, उच्चार यांचा पुन:पुन्हा सराव द्यावा.

कल्पक होऊ या-

शब्द जोडू. अर्थपूर्ण वाक्य बनवू. (जसे- काका आला.)

काका	
मीरा	आला.
रिमा	आली.
चेतन	

दिवस अडतीस

क्षेत्र :- लेखन,
कौशल्य :- लेखन
संकल्पना :- अक्षर गट – ध, य, फ, ओ, ज, श, ◌ो, प्रश्नचिन्ह

अध्ययन निष्पत्ती:- वर्णमालेतील अक्षरे व ध्वनि ओळखतात. लेखन शिकताना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार, विकासस्तरानुसार चित्रे, आडव्या-तिरप्या रेषा, अक्षर आकृत्या, स्वयं-पद्धतीने लेखन आणि स्व- नियंत्रित लेखनाच्या माध्यमातून आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात.

➢ जाणून घेऊ या

शिक्षकांनी अक्षर गटातील अक्षरे असलेल्या शब्द पट्ट्या विद्यार्थ्यांनाद्याव्यात, अथवा फळ्यावर शब्द लिहून द्यावेत. त्या अक्षरांभोवती गोल करण्यास सांगावे. जसे शब्दांमध्ये **ध** शोधा व (ध) असे गोल करा.

जसे की- धरण, धर, धाव, धन इ.

➢ सक्षम बनू या

शिक्षकांनी अक्षर गटातील प्रत्येक अक्षराचे योग्य वळणानुसार विद्यार्थ्यांकडून पाटीवर लेखन करून घ्यावे.

ध ....., य....., फ....., ओ..... , ज....., श.....,

◌ो अक्षर गटातील अक्षरे वापरून अक्षरे लिहा. जसे- सुर, तुर, पुर, सुरगाणा इ.


? हे चिन्ह असलेले वाक्य लिहा. व प्रश्नचिन्हास गोल करण्यास सांगा. वाक्यात प्रश्नचिन्ह वापरण्याविषयी माहिती द्या.

✓ सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अक्षर गटातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द बनविण्यास व लिहिण्यास सांगावे. जास्तीत जास्त शब्द लिहिण्यास शिक्षक प्रोत्साहन द्यावा.

➢ कल्पक बनू या

शिक्षकानी ◌ो चिन्ह आतापर्यंत झालेल्या अक्षर गटातील शब्दांना लावून त्यांचे लेखन करून घ्यावे. शब्द बनविण्यास प्रोत्साहन द्यावे. विद्यार्थ्यांचे कौतुक करावे. दिलेल्या शब्दांपासून प्रश्न बनवा व लिहा, शेवटी प्रश्नचिन्ह द्या.



दिवस एकोणचाळीस

क्षेत्र :- लेखन,
कौशल्य :- लेखन
संकल्पना :- अक्षर गट – ण, ख, थ, औ, भ, ट, ढ, ठ, छ, ष, ौ

अध्ययन निष्पत्ती:- वर्णमालेतील अक्षरे व ध्वनी ओळखतात. लेखन शिकताना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार, विकासस्तरानुसार चित्रे, आडव्या-तिरप्या रेषा, अक्षर आकृत्या, स्वयं-पद्धतीने लेखन आणि स्व- नियंत्रित लेखनाच्या माध्यमातून आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात.

➢ जाणून घेऊ या

शिक्षकांनी अक्षर गटातील अक्षरे असलेल्या शब्द पट्ट्या विद्यार्थ्यांनाद्याव्यात, अथवा फळ्यावर शब्द लिहून द्यावेत. त्या अक्षरांभोवती गोल करण्यास सांगावे. जसे शब्दांमध्ये **भ** शोधा व (भ) असे गोल करा.

जसे की- भर, भूक, भूकंप इ.

➢ सक्षम बनू या

शिक्षकांनी अक्षर गटातील प्रत्येक अक्षराचे योग्य वळणानुसार विद्यार्थ्यांकडून पाटीवर लेखन करून घ्यावे.
ण ....., ख....., थ....., औ..... , भ....., ट....., याप्रमाणे सर्व अक्षर गटातील अक्षरांचे लेखन करून घ्यावे.

ौ अक्षर गटातील अक्षरे वापरून अक्षरे लिहा. जसे- औषध, औक्षण इ.

✓ सराव करू या

शिक्षकांनी अक्षर गटातील प्रत्येक अक्षराचे योग्य वळणानुसार विद्यार्थ्यांकडून पाटीवर लेखन करून घ्यावे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अक्षर गटातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द बनविण्यास व लिहिण्यास सांगावे. जास्तीत जास्त शब्द लिहिण्यास शिक्षक प्रोत्साहन द्यावे.

कल्पक बनू या.

शिक्षकांनी ौ चिन्ह अक्षर गटातील शब्दांना लावून त्यांचे लेखन करून घ्यावे शब्द बनविण्यास प्रोत्साहन द्यावे

विद्यार्थ्यांचे कौतुक करावे. शब्दसाखळीचा खेळ घ्यावा. जास्तीत जास्त लांब शब्द साखळी बनविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. जसे –गवत –तराजू –जनावर –रवी – विमान ----------

दिवस चाळीस

क्षेत्र- वाचन.

क्षमता/कौशल्य- श्रवण, भाषण, वाचन
संकल्पना- वाचनपाठाचे वाचन

अध्ययन निष्पत्ती:- परिचित/अपरिचित मजकुरामध्ये रस घेतात, गप्पा गोष्टी करतात आणि त्यांचे अर्थ शोधण्यासाठी विविध युक्त्यांचा वापर करतात. उदा. केवळ चित्र किंवा चित्र व मजकूर यांच्या मदतीने अंदाज करणे, अक्षर व ध्वनी यांच्या संबंधांचा वापर करणे, पूर्वानुभव आणि माहितीच्या आधारे अंदाज करणे.

➢ जाणून घेऊ या-

१) शिक्षकांनी पुढील वाक्य फलकावर लिहून विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावेत.

1. काका आला.
2. मीरा आली.
3. रिया आली.
4. चेतन आला.

२) वाचनात अडचणी येत असतील तर शिक्षकांनी त्याची नोंद घ्यावी.

३) पुन्हा पुन्हा वाचन सराव द्यावा.

➢ सक्षम होऊ या-

फलकावर लिहिलेला वाचन पाठ विद्यार्थ्यांना वाचनासाठी म्हणून द्यावा.
कठीण ठिकाणी शिक्षकांनी मदत करावी.

वाचन पाठ-१

काका घरी आला.
काकी घरी आली.
रिया आली का?
चेतन आला का?
आले आले.
दोघे आले.
मीरा आत ये.
आई घरात आहे.

✓ सराव करू या

वाक्य वाचू. पाठ समजून घेऊ.

रमा काकू कामावरून आली.
तिला बरे वाटत नाही.
तापही आलाय.
काकाने तिला औषध दिले.
सुरेशने दूधभात दिला.

कल्पक होऊ या

विद्यार्थ्यांना ३/४ वाक्याचे वाचनपाठ तयार करायला सांगा. काही शब्द द्यावेत व ते वापरून वाचनपाठ तयार करण्यास सांगावे.

दिवस एकेचाळीस


क्षेत्र- वाचन.
क्षमता/ कौशल्य- श्रवण, भाषण, वाचन.
संकल्पना- वाचनपाठाचे वाचन.

अध्ययन निष्पत्ती- परिचित/अपरिचित मजकुरामध्ये रस घेतात, गप्पागोष्टी करतात आणि त्यांचे अर्थ शोधण्यासाठी विविध युक्त्यांचा वापर करतात. उदा. केवळ चित्र किंवा चित्र व मजकूर यांच्या मदतीने अंदाज करणे, अक्षर व ध्वनी यांच्या संबंधांचा वापर करणे, पूर्वानुभव आणि माहितीच्या आधारे अंदाज करणे.

➢ जाणून घेऊ या-

१) शिक्षकांनी नवव्या दिवशी सरावासाठी दिलेल्या वाचनपाठाचे वाचन करायला सांगावे.
२) कठीण शब्द असल्यास मदत करावी.
३) वाचनपाठाचे वाचन ही संकल्पना रुजली की नाही ते पहावी. (अर्थपूर्ण वाचन झाले का? याचा पडताळा शिक्षकांनी आपल्या कल्पकतेने घ्यायचा आहे.)

➢ सक्षम होऊ या



1. शिक्षकांनी वाचनपाठ ३ चे वाचन करावे.
2. मजकूर आणि चित्र यांनी मिळून बनलेले वाक्य सुस्पष्ट वाचावे.
3. चित्रांच्या जागा वाचताना करताना विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.
4. विद्यार्थ्यांना वाचायला सांगावे.
5. अडचण कुठे येते ते पाहावे.
6. अडचण दूर करून वाचनासाठी मदत करावी.
7. या पाठात अनेक वचनी शब्द आला आहे. त्यांचा उच्चार पुनःपुन्हा करावा. विद्यार्थ्यांना अशा उच्चारांची ओळख व्हायला हवी.

✓ सराव करू या

शिक्षकांनी वाचनासाठी नवीन वाचनपाठ द्यावा आणि वाचन करण्यास सांगावे. कठीण ठिकाणी विद्यार्थ्यांना मदत करावी. (भाषा साहित्य पेटीतील वाचन पाठ/ पाठ्यपुस्तकातील वाचनपाठ/ शिक्षकांनी स्वतः वाचनपाठ तयार करून)

कल्पक होऊ या-

विद्यार्थ्यांना ५ / ६ वाक्याचे वाचनपाठ तयार करायला सांगा. एखादे वाक्य द्यावे व ते वापरून वाचनपाठ तयार करण्यास सांगावे.

दिवस बेचाळीस

अध्ययन क्षेत्र :-लिपीचीजाण (परिचय)
कौशल्य / क्षमता :- श्रवण,भाषण ,वाचन,लेखन
संकल्पना / संबोध :- सहभागी वाचन- गोष्टींचेपुस्तक)

अध्ययननिष्पत्ती :- चित्रातील वा चित्र मालिकांतील घडणाऱ्या घटना,कृती आणि पात्र यांना एकसंधपणे पाहून त्याचे कौतुक करतात. वाचलेल्या गोष्टी,कविता यातील अक्षरे/शब्द/वाक्ये इत्यादी पाहून आणि त्यांचे ध्वनी ऐकून, समजून ओळखतात.

➢ जाणून घेऊ या ..

मुलांच्या भावविश्वातील व आवडीच्या विषयावरील गोष्टींबद्दल चर्चा करावी. व त्याबाबतची माहिती जाणून घ्यावी.
त्यांनी ऐकलेली गोष्ट सांगण्यास सांगावी शिक्षकांनी एखादी छोटी गोष्ट सांगावी
गोष्टीतील आशयावर लहान लहान प्रश्न विचारावे. उदा. किती पत्र आहेत? गोष्टीचा आशय थोडक्यात सांगा.

➢ सक्षम बनू या..

1. मुलांच्या आवडीच्या विषयावरील मजकूर कमी व चित्रे जास्त असलेले गोष्टीचे पुस्तक निवडावे.
2. कमी मजकूर व मोठी चित्रे असलेली गोष्टींची पुस्तके.
3. मुलांचा सहभाग घेऊन गोष्टीच्या पुस्तकावरील मुखपृष्ठाविषयी चर्चा करावी.
4. त्यानंतर मजकुरावर बोट ठेवून वाचून दाखवावे.
5. गोष्ट वाचून दाखवताना मध्ये-मध्ये काही प्रश्न विचारूया, उदा. जसे काय बर झाले असेल? का झाले असेल? असे चित्रावरून अंदाज बांधायला लावणारे प्रश्न विचारावे.
6. आपण पुस्तक वाचून दाखवताना पुस्तकाचे नाव, लेखक, प्रकाशक, किंमत, मलपृष्ठ, मुखपृष्ठ व चित्रकार इत्यादी बाबी मुलांना दाखवाव्यात.
7. सहभागी वाचनाच्या अगदी सुरुवातीला प्रथम घरच्या भाषेतील गोष्टींची पुस्तकेनंतर द्विभाषीक पुस्तके व पुढे सर्व प्रकारची पुस्तके वापरावी.
8. यामधून मुलांना लेखी मजकुराची जाणीव करून द्यावी. भाषेचे बारकावे समजून सांगावे.
9. डावीकडून वाचले जाते हे सुद्धा मुलांना समजवूया.

चला सराव करू या ..

मुखपृष्ठ व मलपृष्ठ ओळख, पृष्ठ उलटणे, चित्र पाहणे, डावीकडून उजवीकडे वाचायचे असते इत्यादींचा मुलांना सरावाची संधी द्यावी.

कल्पक होऊ या (आव्हाने)..

वाचन कोपऱ्यातील/ ग्रंथालयातील गोष्टीची पुस्तके शोधून यादी तयार करण्यास सांगा.

दिवस
त्रेचाळीस

अध्ययन क्षेत्र :-लेखन
कौशल्य / क्षमता :- लेखन
संकल्पना / संबोध :- वर्णमाला

अध्ययन निष्पत्ती:- वर्णमालेतील अक्षरे व ध्वनी ओळखतात. लेखन शिकताना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार, विकास स्तरानुसार चित्रे, आडव्या-तिरप्या रेषा, अक्षर आकृत्या, स्वयं-पद्धतीने लेखन आणि स्व- नियंत्रित लेखनाच्या माध्यमातून आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात.

➢ जाणून घेऊ या

विद्यार्थी वर्णमालेतील अक्षरे लिहितात का? हे जाणून घ्यावे. योग्य वळणदार अक्षर लेखन करतात का याची खात्री करावी आवश्यकता असल्यास पुन्हा मदत करावी.

➢ सक्षम बनू या

विद्यार्थ्यांना वर्णमालेतील अक्षरांचे लेखन अचूक कसे करावे या विषयी अधिक माहिती द्या व त्यांच्याकडून सराव करून घ्या.

	ा	ि	ी	ु	ू	े	ॅ	ै	ो	ॉ	ौ	ं	ः
क	का	कि	की	कु	कू	के	कॅ	कै	को	कॉ	कौ	कं	क:
ख													
ग													
घ													
च													
छ													
ज													
झ													
ट													
ठ													
ड													
ढ													
ण													
त													
थ													
द													
ध													

✓ सराव करू या

वर्गातील तक्त्याच्या मदतीने वर्णमाला लेखन व वाचन करण्यास सांगा.

कल्पक होऊ या

वर्णमालेतील अक्षरे वापरून अर्थपूर्ण शब्द तयार करण्यास सांगा.

दिवस चव्वेचाळीस

अध्ययन क्षेत्र :-लिपीचीजाण (परिचय)
कौशल्य / क्षमता :-श्रवण, भाषण, वाचन, लेखन
संकल्पना / संबोध :- लेखन नमुन्याचे कोलाज तयार करणे

अध्ययननिष्पत्ती :- परिसरातील छापील मजकूर त्याचा उद्देश यांचा संदर्भाने अंदाज लावतात. उदा. वेस्टणावर लिहिलेले ओळखून गोळी/ चोकलेटचे नाव सांगणे. लेखन शिकताना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार, चित्रे, आकृत्या इत्यादी माध्यमातून आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात.

➢ जाणून घेऊ या

विद्यार्थ्यांकडून त्यांच्या परिसरातील व वापरातील वस्तूंची नावे जाणून घेणे. त्या सर्व वस्तूंच्या नावांची यादीकरून संकलन करणे. परिसरातील उपलब्ध लेखन नमुन्यांचे कोलाज तयार करणे बिस्कीट, चॉकलेट इत्यादीं वस्तूंचे आवरणें. नियतकालिके विविध वस्तूंची वेष्टने (रॅपर)
उदा. चॉकलेटचे व बिस्कीटचा पुडा इत्यादीचे आवरण, बातमीचे शीर्षक इ.

➢ सक्षम बनू या

आपल्या परिसरात उपलब्ध असलेला विविध प्रकारचा मजकूर किंवा नियतकालिकांतील मजकूर विशेषता: त्यांची शीर्षके संकलित करून त्याचे कोलाज तयार करूया.
दैनंदिन मुलांच्या वापरातील वस्तूंची वेस्टने रॅपर त्यावर लिहिण्यात आलेली शीर्षके यांचे सुद्धा संकलन करून कोलाज तयार करावे.
या कोलाजमध्ये अक्षर लेखनाचे विविध नमुने, टाईप्स फॉण्ट साईज असे पहावे.

चला सराव करूया

अक्षरे लिहिण्याच्या पद्धती वेगवेगळ्या असतात हे समजून सराव करण्यास सांगावे.

कल्पक होऊया (आव्हाने):-

मुले स्वतः दैनंदिन वापरातील वस्तूंची वेस्टने रॅपर त्यावर लिहिण्यात आलेली शीर्षके यांचे संकलन करून कोलाज तयार करण्याचा प्रयत्न करतील.

दिवस
४५

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

सेतू-अभ्यास चाचणी क्र. ३

विषय – मराठी

इयत्ता : दुसरी गुण २०

विद्यार्थ्याचे नाव : .....

प्रश्न १) चित्रमालिका दाखवून त्याआधारे गोष्ट सांगण्यास सांगावे. **गुण २**

(चित्रांचा उपयोग करून सुसंगत गोष्ट सांगतो/ सांगते का ते पाहावे.)

प्रश्न २) परिचित शब्दांच्या पट्ट्या दाखवून चार शब्द वाचून म्हणावेत. **गुण २**

(शब्द परिचित स्वर चिन्ह युक्त असावेत.)

प्रश्न ३) विद्यार्थ्यांना कोणतीही कविता अथवा पूरक गाणे म्हणण्यास सांगावे. **गुण १**

(योग्य हालचाली व आवाजात चढ उतार करतो/ करते का ते पाहावे)

प्रश्न ४) वर्णमालेनुसार शब्दांचा क्रम लावणे **गुण १**

(मराठी पेटी मधील संच क्रमांक २० मधील कोणतेही चार शब्द देऊन ते वर्णमालेनुसार लावून घेणे)

प्रश्न ५) वाक्यांचा घटनाक्रम पूर्ण करणे . **गुण २**

(मराठी पेटी मधील संच क्रमांक २५ मधील साहित्याचा वापर करावा.)

प्रश्न ६) कोणत्याही एका वाचन पाठाचे वाचन करून घेणे . **गुण २**

(मराठी पेटी मधील संच क्रमांक १६ चा / शिक्षकांनी स्वतः तयार केलेला वाचनपाठ वापर करावा.)

प्रश्न ७) शब्दात लपलेले शब्द शोध व लिही . **गुण २**

अहमदनगर :- १)-------- २)------- ३)--------- ४)----------

प्रश्न ८) पुढील शब्द जसेच्या तसे लिही . **गुण १**


१) पतंग २) चौरस ३) फुटाणा ४) मेथी

१)---------- २) --------- ३)---------- ४)----------

प्रश्न ९) चित्र पहा, शब्द वाचा, जोडाक्षराला गोल करा **गुण १**



किल्ली



हत्ती

प्रश्न १०) कंसातील योग्य स्वरचिन्हाचा वापर करून अर्थपूर्ण शब्द तयार कर. (ौ, ै, ी, ु) **गुण २**

१) मि र च २) ग ला ब ३) प सा ४) ग त म

प्रश्न ११) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिही . (करावे, घासावेत, उठावे) **गुण २**

१) सकाळी लवकर ----------.
२) नियमित दात ----------.
३) दररोज लेखन ----------.
४) हात जोडून नमन----------

प्रश्न १२) वाक्ये वाचा व उत्तर लिहा . **गुण २**

गरम चणे चवदार असतात.
चणे मुलांना आवडतात .
चणे कसे ?----------
चणे कोणाला आवडतात ?----------

टीप:- १. प्रश्नात स्थानिक परिस्थितीनुसार बदल करण्याचा अधिकार शिक्षकांना राहील परंतू क्षेत्र बदल करता येणार नाही.

२. भाषा साहित्य पेटी उपलब्ध नसल्यास पाठ्यपुस्तक / शिक्षकांनी स्व-निर्मित साहित्याचा वापर करावा.

३. संकेतस्थळावरील / दीक्षा app मधील माहिती वापरता येईल.